दैनिक

www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ५८ • RNI : MAHMAR/2023/87818 मंगळवार दि.२४ डिसेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## तरुणांना संधी द्या पण सीनियर लोकांसाठी जागा ठेवायला हव्यात

# विधानसभेच्या निवडणुकीत उभे केलेच कशाला? छगन भुजबळ यांचा सवाल

**नाशिक (वृत्तसंस्था)–मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील ज्येष्ठ नेते छगन भुजबळ हे नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. तसेच ओबीसी नेत्यांनी भुजबळ यांची त्यांच्या शासकीय निवासस्थानी जाऊन भेट घेत चर्चा देखील केली आहे. या नंतर छगन भुजबळ यांनी माध्यमांशी संवाद साधला आहे. यावेळी त्यांनी अनेक मुद्यांवर प्रतिक्रिया दिली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार माणिकराव कोकाटे यांना मंत्रिपद मिळाले तसेच त्यांच्या स्वागतासाठी नाशिकमध्ये बॅनर लावण्यात आले होते. या बॅनरवर छगन भुजबळ यांचा फोटो मात्र वगळण्यात आला होता. यावर बोलताना छगन भुजबळ म्हणाले, लाखो गरिबांच्या हृदयात आपला फोटो असणे ही बाब माझ्यासाठी पुरेशी आहे.**



पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, मला मंत्रिमंडळाच्या बाहेर ठेवण्यामागे काहीतरी गौडबंगाल असल्याचे मत ओबीसी नेत्यांचे झाले आहे. ओबीसी समाजातील विविध नेत्यांनी आपली भेट घेतली आणि त्यांनी आपल्यासोबत असल्याचे सांगितले. तुम्ही बाहेर असल्याने आम्ही त्रस्त असल्याचे त्यांनी मला सांगितले, अशी माहिती भुजबळांनी दिली आहे.छगन भुजबळ म्हणाले, मी लोकसभेची तयारी केली होती. पण त्यावेळी मला थांबवण्यात आले. त्यानंतर राज्यसभेच्या दोन जागांवर संधी होती. पण त्यावेळीही मला तुमची राज्यात गरज आहे असे सांगत थांबवण्यात आले. मग आता गरज संपली का? मंत्रिमंडळात तरुणांना संधी देण्यासाठी आपल्याला थांबवण्यात आल्याचे म्हटले जात आहे. पण तरुणपणाचे वय काय आहे? तरुणांना संधी द्या पण काही जागा सिनिअर लोकांसाठी ठेवायला हव्यात ना. आधीच सांगायचे ना विधानसभेला उभे राहू नका म्हणून, असे म्हणत त्यांनी त्यांची नाराजी स्पष्ट बोलून दाखवली आहे. राज्यसभेवर जा म्हणणे म्हणजे विधानसभेचा राजीनामा द्यावा लागेल. मग उभे केलेच कशाला? असा सवाल देखील त्यांनी अजित पवारांना उद्देशून केला आहे.छगन भुजबळ म्हणाले, मी ओबीसींसाठी लढणारा नेता आहे. ३५ वर्षे ओबीसींसाठी लढतोय. मराठा समाजाचा द्वेष करत नाही. त्यांना वेगळे आरक्षण द्यावे अशी मागणी आहे. मी मराठा समाजाचा विरोधक नाही. पण तसे चित्र निर्माण केले गेले. ओबीसींसाठी लढताना कुठल्याही इतर समाजाच्या हक्कांवर गदा आणू दिली नसल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले आहे.

## शालेय शिक्षणमंत्र्यांची शाळेला अचानक भेट : विद्यार्थ्यांसोबत बाकावर बसले

**मालेगाव (वृत्तसंस्था)**–शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे अॅक्शन मोडमध्ये आले आहेत. खात्याचा पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच दिवशी त्यांनी मालेगाव तालुक्यातील देवारपाडे या ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी बाकावर बसून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच शाळेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समस्या, अपेक्षा आणि शाळेच्या विकासासाठी लागणाऱ्या गरजांची माहिती घेतली. तसेच विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी शासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिले.



नागपुरातील विधिमंडळ अधिवेशन पार पडल्यानंतर आता सर्वच मंत्र्यांनी नव्या खात्याचा पदभार स्वीकारत कामाला सुरुवात केली आहे. शालेय शिक्षण मंत्री पदाची जबाबदारी दादा भुसे यांच्याकडे आली आहे. दादा भुसे यांनी पहिल्याच दिवसापासून कामाला सुरुवात केली असून अचानक शाळांना भेटी दिल्या.

मालेगाव तालुक्यातील देवरपाडे गावातील शाळेत ते पोहचले. त्यांनी विद्यार्थ्यांकडून वाचन करुन घेतले. कविता म्हणून घेतल्या. मराठी आणि इंग्रजी कविता विद्यार्थ्यांनी म्हटल्या. यावेळी त्यांनी विद्यार्थी व शिक्षकांशी संवाद साधत अडचणी जाणून घेतल्या.जिल्हा परिषदेच्या शाळांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा शासनाचा मानस असून त्यासाठी वेगवेगळ्या पातळ्यांवरुन उपाययोजना करण्यात येणार असल्याचे भुसे यांनी या दौऱ्यात सांगितले.आजकाल आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षणासाठी दाखल करण्याचा पालकांचा कल मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे दिसून येते. परंतु येत्या काळात ही परिस्थिती बदलेल आणि शैक्षणिक दर्जा उंचावल्यानंतर जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण घेण्याचा विद्यार्थ्यांचा कल इंग्रजी माध्यमातील शाळांच्या तुलनेत नक्की वाढलेला दिसेल, असा विश्वास भुसे यांनी व्यक्त केला.

## ते प्रत्यक्षदर्शी असल्यासारखे बोलत आहेत मर्डर म्हणणे योग्य नाही–सुधीर मुनगंटीवार

**नागपूर (वृत्तसंस्था)**–काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी परभणी येथे मृत सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. या भेटीनंतर राहुल गांधी यांनी सोमनाथ सूर्यवंशी दलित असल्यामुळे त्यांची हत्या करण्यात आली, असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केला आहे. तसेच पोलिसांच्या मारहाणीमध्ये त्यांचा मृत्यू झाला असल्याने यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जबाबदार असल्याचे देखील त्यांनी म्हंटले आहे. त्यांच्या या आरोपानंतर भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांना प्रत्युत्तर दिले आहे.



भाजप नेते सुधीर मुनगंटीवार म्हणाले, पराभवावर पराभव झाल्यानंतर, तसेच महाराष्ट्रात सत्तेत येण्याचे हसीन स्वप्ने बघितल्यानंतर जेव्हा एखादा नेता तोंडघाशी पडतो तेव्हा नेत्यांनी कार्यकर्त्यांवर संशय घेऊ नये, नेता अपयशी आहे असा शिक्का लागू नये, म्हणून इतक्या मोठ्या संविधानिक पदावर असणारे इतक्या सहजपणे मर्डर म्हणत आहेत. जसे काही राहुल गांधी हे पोलिस स्टेशनमध्ये जाऊन पुरावाच देणार आहेत. संशय व्यक्त केला तर आपण ते समजू शकतो. मात्र ते इतक्या विश्वासाने सांगत आहेत, जसे काही ते प्रत्यक्ष साक्षीदार होते आणि त्यांनी मर्डर होताना बघितला आहे, असा टोला मुनगंटीवार यांनी राहुल गांधी यांना लगावला आहे.सोमनाथ सूर्यवंशी हे संविधानाचे रक्षण करत होते, ते दलित होते म्हणून त्यांची हत्या करण्यात आली. राहुल गांधी यांच्या या आरोपांवर बोलताना सुधीर मुनगंटीवार म्हणाले, खरेच असे वाटते का की असे झाले असेल? एका माथेफिरूनी जे कृत्य केले, त्या कृत्याच्या संदर्भात जे तीव्र आंदोलन झाले त्या घटनेचा आपण उल्लेख करत आहोत, घटनेच्या चौकटीत राहून त्या ठिकाणी काही कारवाई करण्यात आली. चौकशीचे आदेश देण्यात आले आहे. किंबहुना या संदर्भात आणखी काही चौकशी करायची असेल तर ती ही करता येईल. मात्र एका संविधानिक पदावर असलेल्या व्यक्तीने असे मर्डर म्हणणे योग्य नाही. पुढे सुधीर मुनगंटीवार म्हणाले, एखाद्या चौकशीचा अहवाल आल्यानंतर त्यांनी असे मत व्यक्त केले असते तर गोष्ट वेगळी होती. शंका उपस्थित करणे आणि ठासून बोलणे यात जमीन आसमानचा फरक आहे. एक प्रकारे असे बोलून पोलिसांना फसवण्याचे हे काम आहे. या प्रकरणाची चौकशी करणारे पोलिस कर्मचारी देखील सर्व जाती धर्मातले आहेत. तुम्ही त्यांच्यावर आरोप करून स्वतःच्या स्वार्थासाठी त्यांच्यावर शंका उपस्थित करून त्यांना अडचणीत आणत आहात, असे मुनगंटीवार म्हणाले. ज्या पोलिसांच्या भरवशावर तुमची सुरक्षा असते, जे पोलिस अधिकारी तुमच्यासाठी जीवाची बाजी लावतात, त्यांना तुम्ही शंकेच्या कटघऱ्यात उभे करत आहात? कशासाठी? केवळ तुमचा मनसुबा पूर्ण व्हावा यासाठी? असा संतप्त सवाल देखील सुधीर मुनगंटीवार यांनी उपस्थित केला.

## राहुल गांधी केवळ राजकीय हेतूने आले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आरोप





**पुणे (वृत्तसंस्था)**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्याविषयी विधान करताना म्हणाले की आम्ही सगळे त्यांचा सन्मान करतो. मंत्रिमंडळात घेण्यात आले नाही तेव्हा आमच्या मनात त्यांना राष्ट्रीय पातळीवर पाठवण्याचा विचार होता, तसेच भुजबळांसारखे नेते आमच्या सोबत असलेच पाहिजेत, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हंटले आहे. पुढे राहुल गांधी यांनी परभणी येथे दिलेल्या भेटीवर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की राहुल गांधी केवळ राजकीय हेतूने परभणीत आले होते. ही राजकीय भेट होती. लोकांमध्ये जाती जातीत भेद निर्माण करायचे ते गेली अनेक वर्षे काम करत आहेत. त्यामुळे मला असे वाटते की त्यांचे जे विद्वेषाचे काम त्यांनी त्या ठिकाणी जाऊन केले आहे. आमचे सरकार संवेदनशील असल्यामुळेच या संपूर्ण प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात येणार आहे. यात सगळे समोर येईल, तसेच कुठल्याही आरोपीला सोडण्यात येणार नसल्याची ग्वाही फडणवीस यांनी दिली आहे. राहुल गांधी यांनी सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांची भेट घेतली होती. या भेटीनंतर सोमनाथ सूर्यवंशी दलित असल्याने त्याची हत्या केली असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. तसेच या प्रकरणी पोलिस तसेच मुख्यमंत्री जबाबदार असल्याचे देखील त्यांनी म्हंटले आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज अतिशय आनंदाची गोष्ट आहे की प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंतर्गत या वर्षी आपल्याला केंद्र सरकारने साडे सहा लाख घरे मंजुर करण्यात आली होती आता ते टार्गेट वाढवण्यात आले आहे. अतिरिक्त १३ लख घरे आपल्याला देण्यात आली आहेत. एकूण आपण विचार केला तर जवळपास या वर्षी केंद्र सरकारच्या वतीने गरिबांसाठी, बेघरांसाठी तसेच कच्च्या घरात राहणाऱ्यांसाठी एका वर्षात २० लख घरे देण्याची घोषणा केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चव्हाण यांनी केली आहे. महाराष्ट्राला मोदी सरकारने दिलेली ही अत्यंत मोठी भेट आहे. तसेच देशाच्या इतिहासात कुठल्याच राज्यात एका वर्षात एवढी घरे मिळालेली नाहीत. आणखी एक मोठी घोषणा करण्यात आली आहे की ज्यांची नावे सुटली होती त्यांना नव्या सर्वेक्षणात घेण्यात येणार आहे. असा निर्णय माननीय मोदी यांनी केला आहे. आणि हा संकल्प शिवराज सिंह चव्हाण यांनी सांगितला आहे.

## ५वी–८वीत नापास होणाऱ्या मुलांना पुढच्या वर्गात ढकलणार नाही : २ महिन्यांत फेरपरीक्षा होईल

**मुंबई (वृत्तसंस्था)**–इयत्ता ५वी आणि ८वीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना यापुढे पुढच्या वर्गात ढकलण्यात येणार नाही. केंद्र सरकारने सोमवारी 'नो डिटेन्शन पॉलिसी' संपवली आहे. यापूर्वी या नियमानुसार नापास झालेल्या विद्यार्थ्यांना द्वितीय श्रेणीत बढती दिली जात होती.सरकारच्या नव्या अधिसूचनेनुसार, अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना २ महिन्यांत फेरपरीक्षेची संधी दिली जाणार आहे. जर ते पुन्हा नापास झाले तर त्यांना पुढच्या वर्गात प्रवेश मिळणार नाही, पण ते ज्या वर्गात शिकत होते त्याच वर्गात पुन्हा अभ्यास करावा लागेल. आठवीपर्यंतच्या अशा मुलांना शाळेतून काढून टाकले जाणार नाही, अशी तरतूदही सरकारने केली आहे. १६ राज्यांमध्ये नो–डिटेंशन पॉलिसी आधीच लागू करण्यात आली आहे केंद्र सरकारच्या नव्या धोरणाचा परिणाम केंद्रीय विद्यालये, नवोदय विद्यालये आणि सैनिक शाळांसह ३ हजारांहून अधिक शाळांवर होणार आहे. १६ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांनी (दिल्ली आणि पुद्दुचेरी) आधीच नो–डिटेंशन धोरण रद्द केले आहे. शिक्षण मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, शालेय शिक्षण हा राज्याचा विषय आहे, त्यामुळे राज्ये या संदर्भात स्वतःहून निर्णय घेऊ शकतात.ही योजना फक्त केंद्र संलग्न शाळांसाठी आहे. राज्य सरकार हा निर्णय ते त्यांच्या शाळांसाठी घेतील की नाही हे पूर्णतः त्यांच्यावर अवलंबून आहे.

ही योजना फक्त केंद्र संलग्न शाळांसाठी आहे. राज्य सरकार हा निर्णय ते त्यांच्या शाळांसाठी घेतील की नाही हे पूर्णतः त्यांच्यावर अवलंबून आहे.

सरकारने धोरण का बदलले? २०१०–११ पासून इयत्ता ८ वी पर्यंतच्या परीक्षेत अनुत्तीर्ण होण्याच्या तरतुदीवर बंदी घालण्यात आली होती. म्हणजे मुले नापास होऊनही त्यांना पुढच्या वर्गात बढती मिळत होती, पण त्यामुळे शिक्षणाचा स्तर हळूहळू घसरत असल्याचे दिसून आले. ज्याचा परिणाम दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षांवर होऊ लागला. या विषयावर बराच वेळ विचारविनिमय केल्यानंतर नियमात बदल करण्यात आला.शिक्षण हक्क कायद्याच्या नो–डिटेंशन धोरणानुसार, इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही विद्यार्थ्याला नापास करता येत नाही किंवा शाळेतून काढून टाकता येत नाही. परीक्षेत अनुत्तीर्ण होऊनही आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना पुढील वर्गात बढती देण्याची तरतूद आहे.२०१८ मध्ये हे विधेयक लोकसभेत मंजूर झाले जुलै २०१८ मध्ये शिक्षणाच्या अधिकारात सुधारणा करणारे विधेयक लोकसभेत मांडण्यात आले. यामध्ये शाळांमध्ये लागू करण्यात आलेले 'नो डिटेन्शन पॉलिसी' रद्द करण्याची चर्चा होती. त्यानुसार पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांच्या नियमित परीक्षा घेण्याची मागणी करण्यात आली होती. यासोबतच अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची दोन महिन्यांत फेरपरीक्षा घेण्याचीही चर्चा होती.२०१९ मध्ये हे विधेयक राज्यसभेत मंजूर झाले. यानंतर, राज्य सरकारांना 'नो डिटेन्शन पॉलिसी' काढून टाकण्याचा किंवा तो लागू ठेवण्याचा अधिकार होता. म्हणजे पाचवी आणि आठवीमध्ये नापास झाल्यास त्यांना बढती द्यायची की पुन्हा त्याच वर्गात ठेवायचे हे राज्य सरकार ठरवू शकले असते.

## १० लाखांनी बलिदानाचा विषय संपतो का? परभणीतील घटनेवरून थोरातांचा सवाल

**परभणी (वृत्तसंस्था)**–काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी परभणीच्या मुद्यावरून राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. परभणीतील ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे याबाबत शंका नाही. सत्ताधाऱ्यांची मानसिकता पाहता त्यांच्याकडून काय अपेक्षा करणार, असे थोरात म्हणाले. १० लाख रुपयांच्या मदतीने बलिदानाचा विषय संपतो का? असा सवालही बाळासाहेब थोरात यांनी केला.

परभणी येथे गत १० डिसेंबर रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाली होती. या घटनेच्या १२ दिवसांनंतर काँग्रेस नेते राहुल गांधी आज परभणीत येऊन या घटनेत बळी गेलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी माध्यमांशी संवाद साधत सरकारवर हल्लाबोल चढवला.परभणीतील ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे याबाबत शंका नाही. परंतु सत्ताधाऱ्यांची मानसिकता पाहिल्यानंतर त्यांच्याकडून काय अपेक्षा करायच्या. सर्वोच्च सभागृहात सत्ताधाऱ्यांकडून ज्या पद्धतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख केला जात आहेत. त्यावरून त्यांची पुरोगामी विचाराकडे पाहण्याची दृष्टी दुर्दैवी आहे, अशी टीका थोरात यांनी केली. तसेच जनतेने हे सर्व जागृतपणे पाहिले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.बाळासाहेब थोरात पुढे बोलताना म्हणाले की, संतोष देशमुख यांचे बलिदान वाया जाता कामा नये. १० लाख रुपयांच्या मदतीने बलिदानाचा विषय संपतो का? असा सवालही त्यांनी केला.

# शिक्षक हे शिक्षक की वेठबिगार?

**इतर देशांत ज्याप्रमाणे शिक्षकांना सन्मानाने वागणूक दिली जाते. दुर्दैवाने तशी आपल्याकडे प्रशासन देत नाही. ज्या शिक्षकांच्या हाताखाली हजारो विद्यार्थी घडतात. अधिकारी होतात. माणूस बनतात. त्याच शिक्षकांना जर शैक्षणिक कामे सोडून एखाद्या वेठबिगारीप्रमाणे अशैक्षणिक कामात गुतवले जात असेल तर दोष कुणाला द्यायचा? शासनाला, प्रशासनाला की समाजाला. शिक्षकांचे काम शिकविण्याचे आहे. त्यांना वर्गात शिकवू द्या. शिक्षकांकडील अशैक्षणिक कामे काढून त्यांना केवळ शैक्षणिक कामे द्या. ही शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी सभागृहात केलेली मागणी योग्यच आहे. कुठल्याही शिक्षणप्रेमी माणसाला ती पटेल यात शंका नाही. सुसंस्कृत विद्यार्थी घडवायचे असेल तर समाजाने आमदार अडबाले यांच्या भूमिकेशी समरस होण्याची गरज आहे.पाठींबा देण्याची आवश्यकता आहे.**


भारतीय समाज व्यवस्थेमध्ये गुरूंना म्हणजेच शिक्षकांना मौलिक असे स्थान आहे. शिक्षक सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व्यवस्थेतील महत्त्वपूर्ण कणा आहे. आपल्या विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन, जीवन यशस्वीपणे जगण्याची तालीम देत, निरागस मातीच्या गोळ्याला आकार देण्याचे कार्य शिक्षक करत असतात. छोट्या मुलांवर कोणत्याही प्रकारचे संस्कार करणे हे पाहिजे तेवढे सोपे काम नाही. ते आई आणि शिक्षक या दोन घटकांनाच कळू शकते. कुटुंबात आई आणि कुटुंबाबाहेर म्हणजे शाळेत शिक्षक मुलांवर विविध प्रकारचे संस्कार करत असतात. त्यातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व आकारास येत असतं. फळत असते. फुलत असते. बहरत असते. पूर्वी शिक्षकांकडे विद्यार्थ्यांवर केवळ शैक्षणिक संस्कार करण्याची म्हणजे शिकवण्याची जबाबदारी होती. परंतु अलीकडे शासनाचा शिक्षकांकडे बघण्याचा दृष्टिकोन जणू काही एखाद्या वेठबिगारासारखा झाल्याचे दिसत आहे. ज्याप्रमाणे एखाद्या वेठबिगाराला अनेक कामांत गुंतवून त्याच्याकडून हवी ती कामे हक्काने करवून घ्यायची. त्याच्या शारीरिक, मानसिक त्रासाचा विचार न करता प्रशासनाने सांगिलेली कामे पूर्ण होणे एवढेच उद्दिष्टे सरकारी यंत्रणा ठेवत आहे की काय असे दिसते. प्रशासन बहुतांश शिक्षकांना अशैक्षणिक अशा वेठबिगारी कामात गुंतवून ठेवत आहे. त्याचा प्रतिकूल प्रभाव परिणाम शिक्षकाच्या मानसिक व शारीरिक स्वास्थ्यावर होत असतो. परिणामतः ज्या कामांसाठी शिक्षकांची नियुक्ती केली आहे. त्याकडे त्यांचे दुर्लक्ष होणे क्रमप्राप्त आहे. खर म्हणजे शिक्षकांना शालेय परिसरात विद्यार्थ्यांना शिकविण्या व्यतिरिक्त इतर कामे द्यायलाच नको. ज्या शैक्षणिक कामासाठी त्यांची नियुक्ती झाली ते शिकवण्याचे काम प्राधान्याने करायची संधी द्यायला पाहिजे. परंतु अलीकडे शिक्षकांकडे शासनाकडून दिल्या जाणाऱ्या विविध जबाबदाऱ्या बघता यात कुठेतरी सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. अलिकडे शिक्षकांना शिक्षणा व्यतिरिक्त इतर कामे इतकी वाढलेली आहेत की, शिक्षक नावापुरताच उरला आहे. तो अशैक्षणिक कामांच्या ओझ्याखाली इतका दबला आहे की त्याला मुलांना शिकविण्यासाठी वेळच मिळत नाही. विद्यार्थ्यांवर सुयोग्य पद्धतीने शैक्षणिक संस्कार करायला वेळ मिळत नाही. परिणामतः विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व व शैक्षणिक ज्ञान यात अपूर्णता राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांना वर्गात शिक्षणाची फार मोठी आवश्यकता असते. शिक्षणाने माणूस शहाणा होतो. सुजाण नागरिक होतो. परंतु इतर कामांची ओझी डोक्यावर असल्याने व ती जबाबदारी मर्यादित कालावधीत पूर्ण करून द्यावी लागत असल्याने शिक्षकांना मोकळीक नसते. त्यामुळे अनेक विद्यार्थी कच्चे लिंबू असल्याचे सिद्ध होत आहे. या निमित्ताने एवढे सुचवावेसे वाटते की, प्रशासनाने शिक्षकांना जर शिक्षक म्हणून नियुक्ती दिली आहे तर त्यांच्यावर शिक्षणाशिवाय इतर कोणत्याही प्रकारचा बोजा टाकता कामा नये. प्रशासनाकडे अनेक प्रकारचे आर्थिक फंड असतात. त्यातून बेरोजगारांना मानधन देऊन विविध प्रकारचे सर्वे असो, निवडणूक कामे कामे असो, माहिती संकलन, फार्म भरणे असो. ही चांगल्या पद्धतीने करून घेता येईल. शासनाने शिक्षकांवर लादलेली कामे

बेरोजगारांना करण्याची संधी उपलब्ध करून दिली तर बेरोजगारांना रोजगार मिळेल. आणि शिक्षकांना पूर्ण वेळ अध्यापनाचे कार्य करून मुलांची आदर्श पिढी घडविता येईल. अन्य प्रगत देशात शिक्षकांना जो मानसन्मान आहे. तो मानसन्मान दुर्दैवाने आपल्याकडे कमी होत चालल्याचे दिसत आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार



**पब्लिक टॅग**
**डॉ.यशवंत घुमे**
**मो.९८२२२३३९१२**

शिक्षण द्यावयाचे असेल तर शिक्षकांना केवळ शिकवण्याचीच जबाबदारी असायला हवी. परंतु प्रशासनाला शिक्षकांकडून वेगवेगळ्या प्रकारच्या अपेक्षा असतात. त्यामुळे त्यांना विविध कामांत आणि जबाबदारीत गुंतवले जात आहे. या वाढत्या अशैक्षणिक कामांच्या ओझ्याखाली दबुन गेल्याने शिकवण्याकडे सहाजिकच दुर्लक्ष होत आहे. शिक्षकांनी चांगले वागावे, नितीमत्ता जपावी, प्रामाणिक रहावे अशी समाजाची अपेक्षा असते. विद्यार्थ्यांचीही अपेक्षा असते. सगळ्यांचीच अपेक्षा असते. आणि हे खरेही आहे. आपल्याकडे बोट दाखवण्याची संधी कोणाला उपलब्ध होणार नाही ही काळजी शिक्षकांनीही घेतली पाहिजे. कारण शिक्षक हा समाजात आदर्श असतो. त्यांचे अनुकरण करून विद्यार्थी घडत असतात. त्यांचा आदर्श ठेवून असतात. त्यासाठी शिक्षक आपल्यापरीने प्रयत्न करतातही.पिढ्या घडवतात. इतर क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी कसेही वागले तरी समाज त्यावर टीका करत नाही. पण शिक्षकांचे थोडेसे चुकले तर समाजाला ते आवडत नाही. यावरून शिक्षकांनी आपले समाज व्यवस्थेमध्ये असलेले स्थान समजून घ्यायला पाहिजे. वेगवेगळ्या क्षेत्रात शिक्षकांनी घडविलेले विद्यार्थी पुढे जबाबदार नागरिक व अधिकारी बनतात. तेच देश चालवतात. आपल्याला घडविणारे कोण शिक्षक आहे आणि कोण नाही हे त्यांना बरोबर कळते. आजचा विद्यार्थी हा उद्याचा जबाबदार नागरिक असतो. तो त्या गोष्टी बरोबर लक्षात ठेवतो. मन लावून शिकविणारे शिक्षक हे आयुष्यभर लक्षात राहतात. म्हणून शिक्षकांनीही शिकविण्याला विशेष प्राधान्य दिले पाहिजे. सतत वाचन, अध्ययन, अभ्यास, चिंतनशीलता यातून ज्ञानप्रक्रिया तेवत ठेवली पाहिजे. आणि नवीन पिढीला ते ज्ञान स्थलांतरित केले पाहिजे. वाचन वाढविले पाहिजे, चिंतन मनन वाढविले तर ते सहज शक्य आहे. प्रशासनाने त्यांच्या कामात अडथळे येणार नाही त्यासाठी इतर कामाचा बोजा दूर करायला पाहिजे. पूर्णवेळ शिकविण्यासाठी शिक्षकांना कसा वेळ देता येईल यासाठी शासनाने प्रयत्न करायला पाहिजे, असे जर झाले तर उद्या ज्ञानसंपन्न पीढी घडल्याशिवाय राहणार नाही. शिक्षक हा जगातील सर्वात श्रेष्ठ कलावंत असून सार्वजनिक जीवनात समाज त्यांच्याकडे कलावंताच्या भूमिकेतून बघत असतो. ज्याप्रमाणे ओल्या मातीच्या गोळ्याला आकार देऊन कुंभार त्याला सर्वांगसुंदर बनवतो. त्याचप्रमाणे शिक्षकांचे काम आहे. म्हणूनच समाजात शिक्षकांकडे अभिमानाने आणि आदराने बघितले जाते. ओबडधोबड पाषाणांना ज्याप्रमाणे मूर्तिकार घासून घासून परिश्रमपूर्वक देवाची मूर्ती घडवितो आणि सारे जग त्या मूर्तीच्या पायाला पुजतात. त्याचप्रमाणे सत्यम शिवम सुंदरम व्यक्तिमत्व घडविण्याचे काम शिक्षक करीत असतात. जिवंत मूर्ती घडविण्यासाठी जिवंत मनाच्या शिक्षकांची आवश्यकता असते. परंतु या शिक्षकांना अलिकडे शैक्षणिक कामे सोडून अन्य अशैक्षणिक कामातच जास्त गुंतवले जात आहे. वर्गात शिकविणे हे शिक्षकांचे काम. परंतु अलीकडे जी कामे त्यांची नाहीतच अशा असंबंधित कामांत गुंतवून त्यांची ऊर्जा खर्ची घातली जात आहे. शिक्षकांना अखंड वाचन, मनन, चिंतन या सारख्या ज्ञानाच्या कक्षा रुंदवणाऱ्या गोष्टींपासून दूर ठेवत शिक्षकांना प्रशासन नको त्या कामात गुंतवून ठेवत आहे. त्यामुळे शिक्षकांच्या ज्ञान साधनेत मर्यादा येतात. शिक्षकांवरील शिक्षणेत्तर कामांच्या जबाबदाऱ्या बघता शिक्षक केवळ नावापुरताच शिक्षक उरला आहे. म्हणून प्रशासनाने शिक्षकांकडील वेठबिगारीची इतर कामे काढून केवळ शिक्षण शिकविण्यापुरतेच त्यांचे क्षेत्र मर्यादित करायला पाहिजे. असे झाले तरच येणारा उद्याच्या काळाला भवितव्य आहे. अन्यथा कोवळ्या मनांवर शैक्षणिक संस्कार अपुरे पडल्यामुळे भावी पिढीचे काय भवितव्य राहील हे सांगण्यासाठी कुठल्याही ज्योतिषाची गरज लागणार नाही.




**आदिवासींना मुख्य प्रवाहात आणावं, त्यांची पिळवणूक थांबावी आणि त्यांना माणूस म्हणून जगण्याची संधी मिळवून द्यावी असं श्रद्धेय बाबा आमटे यांच्या मनात होतं. या कामाची जबाबदारी डॉ. प्रकाश आमटे यांनी घेतली. त्यांच्या या खडतर कार्यांत भक्कमपणे साथ दिली ती त्यांच्या अर्धांगिनी डॉ. मंदाताई आमटे यांनी. त्यांच्यामुळे डॉ. प्रकाशभाऊंना बाबांचं स्वप्न हेमलकशात प्रत्यक्षात साकारता आलं. आज तारीख २४ डिसेंबर. डॉ. प्रकाश आमटे आणि डॉ. मंदाकिनी आमटे यांच्या विवाहाचा दिन. दैनिक सह्याद्रीचा राखणदार परीवाराच्यावतीने उभयतांना लग्न वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.**

## शिंगवेतुकाई फाटा येथे अपघात
# महिला ठार, कार चालका विरुद्ध गुन्हा दाखल

**नेवासा | प्रतिनिधी**
शिंगवेतुकाई फाटा (ता. नेवासा) येथे झालेल्या भीषण अपघातात जया दिनकर काळे (वय ३०, रा. वडुले, ता. शेवगाव) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. रामेश्वर लक्ष्मण भगत (रा. ठाकूर निमगाव, ता. शेवगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, जया काळे या अहिल्यानगर येथील बालसंगोपन विभागातील काम आटोपून घरी परतत होत्या. अहिल्यानगर ते घोडेगाव मार्गावर शिंगवेतुकाई फाट्याजवळ एम.एच. २० बीएम १५३७ क्रमांकाच्या कारने त्यांच्या एम १९ सिझेड ५५५५ क्रमांकाच्या दुचाकीस पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात जया काळे गंभीर जखमी होऊन ठार झाल्या. अपघातानंतर कार चालक गौरव अनिल गवळी (रा. खादगाव, ता. जामनेर) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल तुपे करत आहेत.




## वाघाये महाविद्यालयात सायबर गुन्हेगारीविषयी जन जागृती विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षिततेचे महत्त्व पटवून दिले

**भंडारा | प्रतिनिधी**
लाखनीतील स्व. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य, आणि विज्ञान महाविद्यालयात सायबर गुन्हेगारीविषयी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या घटनांबाबत जागरूक करणे व सायबर सुरक्षिततेचे महत्त्व समजावून सांगणे हा होता.
कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. गणेश कापसे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सायबर गुन्हेगारीच्या घटनांमध्ये होत असलेल्या वाढीबाबत चिंता व्यक्त केली आणि सतर्कतेचे आवाहन केले. सायबर सेलचे मुख्य कार्यवाहक आकाश खेडीकर यांनी सायबर गुन्ह्यांच्या विविध प्रकारांवर प्रकाश टाकत फेसबुक, व्हॉट्सअप, इंस्टाग्राम, आणि स्नॅपचॅटसारख्या प्सचा सुरक्षित वापर करण्याच्या टिप्स दिल्या. त्यांनी विद्यार्थ्यांना सावध राहून कोणत्याही अनधिकृत लिंक किंवा



माहितीवर क्लिक न करण्याचा सल्ला दिला. पोलीस अधिकारी दिनेश आंबेडारे यांनी सोशल मीडियावरील संवेदनशील पोस्टिंगच्या परिणामांवर चर्चा करताना उदाहरणाद्वारे संभाव्य कायदेशीर कारवाईबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की, इंटरनेटवरील प्रत्येक कृती सार्वजनिक असते आणि त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. कार्यक्रमाचे संचालन डॉ. पुण्यशिल टेंभुर्णे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील विविध प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण झाली असून सायबर गुन्हेगारीविरोधात सजगता वाढली आहे. महाविद्यालयाच्या या प्रयत्नांमुळे विद्यार्थी सायबर जगात सुरक्षित राहण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलत आहेत.

## शिर्डीत २४ व २५ डिसेंबरला तृतीय 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषद'; १ सहस्रांहून अधिक प्रतिनिधींचा सहभाग अपेक्षित

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**
मंदिर व्यवस्थापनातील समस्या सोडवणे, परंपरांचे रक्षण करणे, दर्शनाच्या सुविधा सुधारणे आणि भाविकांसाठी सुविधा उपलब्ध करून देणे यांसाठी मंदिरांचे विश्वस्त, पुजारी, आणि भक्तांना एकत्र आणण्यासाठी २४ व २५ डिसेंबर रोजी शिर्डीत तृतीय 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे'चे आयोजन करण्यात आले आहे.
ही परिषद श्री साई पालखी निवारा, नगर-मनमाड रोड, निमगाव, शिर्डी येथे होणार आहे. महाराष्ट्र मंदिर महासंघ, श्री जीवदानीदेवी संस्था, श्री ज्योतिर्लिंग भीमाशंकर देवस्थान, श्री साई पालखी निवारा, आणि हिंदु जनजागृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने परिषद आयोजित करण्यात आली आहे.
परिषदेमध्ये मंदिरांच्या सरकारीकरणातून मुक्तता, अतिक्रमणाचे मुद्दे, परंपरा जपण्यासाठी उपाययोजना, दुर्लक्षित मंदिरांचा जीर्णोद्धार आणि तीर्थक्षेत्र परिसरात मद्य-मांस बंदी यांसारख्या विषयांवर चर्चा होईल.
या परिषदेतील मान्यवरांमध्ये सर्वोच्च




न्यायालयाचे अधिवक्ता विष्णु शंकर जैन, स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष रणजीत सावरकर, जय महाराष्ट्र वृत्तवाहिनीचे संपादक प्रसाद काथे, डॉ. अमित थढाणी, संदीप सिंह, आणि ऋत्विक औरंगाबादकर यांसह अष्टविनायक आणि ज्योतिर्लिंग देवस्थानांचे विश्वस्त, संत पीठांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. 'महाराष्ट्र मंदिर महासंघा'चे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी परिषदेविषयी माहिती देताना सांगितले की, महासंघाच्या माध्यमातून राज्यातील ८०० हून अधिक मंदिरांमध्ये वस्त्रसंहिता लागू करण्यात आली असून १५,००० हून अधिक मंदिरांचे देशभर संघटन झाले आहे. ही परिषद केवळ निमंत्रितांसाठी असून अधिक माहितीसाठी ७०२०३८३२६४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# श्रीरामपूर मर्चंट असोसिएशनच्या पाच जागांसाठी २५ डिसेंबरला निवडणूक
## मतमोजणी व निकाल तत्काळ

**श्रीरामपूर | प्रतिनिधी**
श्रीरामपूर मर्चंट असोसिएशनच्या पाच संचालक पदांसाठी २५ डिसेंबर रोजी निवडणूक होणार असून, एकूण नऊ उमेदवार रिंगणात आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. सुहास चुडिवाल यांनी ही माहिती दिली आहे. या निवडणुकीत नंदकुमार कोठारी, दत्तात्रय धालपे, प्रवीण बोरा, वैभव गुजराणी, संदीप अग्रवाल, बाळासाहेब ढेरंगे, योगेश ओझा, जयकिसान मिलानी, आणि स्वप्निल चोरडिया हे उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.
सुनील गुप्ता, राहुल मुथा, मुकेश कोठारी, प्रेमचंद कुंकुलोळ, आणि दत्तात्रय धालपे हे विद्यमान संचालक सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या जागांसाठी निवडणूक होत आहे. २५ डिसेंबर रोजी सकाळी ७ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. त्यानंतर लगेचच मतमोजणी करून निकाल जाहीर



केला जाईल, असे निवडणूक अधिकारी ॲड. सुहास चुडिवाल यांनी स्पष्ट केले आहे.ही निवडणूक व्यापारी व औद्योगिक क्षेत्रातील महत्त्वाचा मुद्दा ठरणार असून, व्यापारी वर्गाचे लक्ष या निकालाकडे लागले आहे.

## भद्रावती येथे संपूर्ण गोंडीयन आदिवासी वीर-विरांगणा जयंती सोहळा २५ ला

**भद्रावती | प्रतिनिधी**
गोंडीधर्मीय आदिवासी बहुउद्देशीय संघटना,भद्रावती तर्फे दिनांक २५ डिसेंबर रोज बुधवारला सकाळी १० वाजता स्थानिक जिल्हा परिषद हायस्कूल येथे संपूर्ण गोंडीयन आदिवासी वीर-विरांगणा जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने मुठपुजेसह विवीध धार्मिक तथा प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.याशिवाय भिमालपेन पेनठाणा तहसील कार्यालय भद्रावती येथुन गोंडराजे महात्मा रावण मडावी यांच्या शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.रात्रोला आदिवासी गोंडी पारंपरिक नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.या सोहळ्याला संपूर्ण आदिवासी बांधवांनी ऊपस्थीतराहण्याचे आवाहण गोंडीधर्मीय आदिवासी संघटना भद्रावती यांचे तर्फे करण्यात आले आहे.

## फिरत्या चाकावरती देशी मातीला आकार. .विठ्ठला तु वेडा कुंभार....



**नागभिड मधील एक कुंभार बांधव मातीचे भांडे बनवितांना काढलेले छायाचित्र.छाया: प्रणय बांगरे**

# रक्कम अखर्चित राहत असेल तर हे योग्य नाही

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

औषधांच्या संदर्भात रक्कम अखर्चित राहत असेल तर ही योग्य बाब नाही. या अहवालाच्या तपशीलात मी अजून गेलेलो नाही. त्याचा संपूर्ण अभ्यास केल्यावर मी याबाबत बोलेल, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॅगच्या अहवालावर दिली.

आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार यांच्या मुलाच्या लग्नाला अहिल्यानगर येथे मुख्यमंत्री फडणवीस यांनी रविवारी हजेरी लावली. यावेळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे, गिरीश महाजन आदींसह आमदार शिवाजी कर्डिले, आ.संग्राम जगताप, आ. काशिनाथ दाते आदी उपस्थित होते .लग्न सोहळ्यानंतर आमदार कर्डिले यांच्या निवासस्थानी फडणवीस यांनी भेट दिली. त्यावेळी कॅगच्या अहवालावर त्यांनी प्रतिक्रिया दिली.

आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण औषधी विभागांतर्गत येणाऱ्या संस्थासाठी हाफकिनला औषध खरेदीची जबाबदारी देण्यात आली होती. मात्र, कॅगच्या अहवालात हाफकिनने ७१ टक्के औषध पुरवठा केलाच नसल्याचे समोर आले आहे. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत अश्या प्रकारे जर औषधांच्या संदर्भात रक्कम अखर्चित राहिली असेल, तर ती योग्य बाब नाही, असे म्हटले आहे. कॅबिनेटमध्ये जी माहिती देण्यात आली, तेवढीच मी ऐकली आहे. त्या अहवालाच्या तपशीलात मी गेलेलो नाही. त्यावर अभ्यास करून मी बोलेल, असेही त्यांनी सांगितले.

अहिल्यानगरमध्ये विळद येथील हेलिपॅडवर मुख्यमंत्री फडणवीस यांचे आगमन झाल्यावर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी त्यांची भेट घेऊन स्वागत केले. यावेळी त्यांनी नव्या सरकारला शुभेच्छा दिल्या. जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे यांनीही फडणवीस यांचे स्वागत केले.



# विमा प्रतिनिधींचे विविध मागण्यांसाठी धरणे

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

एलआयसीने बनविलेला नवीन कायदा रद्द करावा, या व इतर मागण्यांसाठी विमा प्रतिनिधींच्या संघटनेच्यावतीने पुणे एलआयसी विभागीय कार्यालयासमोर ऑल इंडिया लि.(आफी) संघटनेच्या पुणे विभाग एक आणि दोनच्या वतीने एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आल्याची माहिती संघटनेच्या पुणे एकचे सचिव प्रमोद छाजेड व पुणे दोनचे उपाध्यक्ष दिलीप मुंदडा या शेवगावच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

पुणे विभागीय कार्यालयाला दिलेल्या निवेदनात विमा पॉलिसीवरील जीएसटी त्वरित रद्द करावा, विमाधारकांना मिळणाऱ्या बोनसमध्ये वाढ करावी, विमा प्रतिनिधींना मिळणाऱ्या कमिशन, मेडिक्लेम, ग्रॅज्युटी,मध्ये वाढ करावी तसेच सर्वसामान्य उमेदवारांना पॉलिसी घेण्यासाठी पहिल्याप्रमाणेच एक लाखाची पॉलिसी चालू असावी ,आदी मागण्या करण्यात आल्या असून, आंदोलन उभारण्याचा इशारा राज्यातून आलेल्या विमा प्रतिनिधींनी दिला.




आंदोलनात ऑल इंडिया लाइफ इन्शुरन्स फेडरेशनच्या पश्चिम क्षेत्रीय विमा प्रतिनिधी संघटनेचे अध्यक्ष सुधीर पाध्ये, संघटनेच्या पुणे एक विभागाचे सचिव प्रमोद कुमार छाजेड, पुणे विभाग दोनचे सेक्रेटरी रमेश कांबळे ,उपाध्यक्ष दिलीप मुंदडा, संघटक सचिव संजय नवघणे, डॉ.सोमनाथ देवकाते, माधव जोशी, शेवगावचे ज्येष्ठ विमा प्रतिनिधी नंदकिशोर खरोडे, अजय भंडारी, महेश गुगळे, संदीप साखरे, शीतल गोरे आदी प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# संजीवन निसर्गोपचार केंद्रात जागतिक ध्यानधारणा दिन साजरा

**नागपूर । प्रतिनिधी**

संजीवन सोशिओ मेडिकल फाऊंडेशन संचालित संजीवन निसर्गोपचार आणि योग केंद्र आमगाव (देवळी) हिंगणा नागपूर यांच्यावतीने जागतिक ध्यानधारणा (मेडिटेशन) दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक संघ प्रभात शाखा दिनदयाल नगरचे अध्यक्ष दिलीप कातरकर यांच्या नेतृत्वात सुमारे ६० सदस्यांनी संजीवन निसर्गोपचार केंद्राला भेट दिली. संजीवन निसर्गोपचार केंद्राच्या शांत, निसर्गरम्य परिसरात त्यांनी ध्यानसाधना केली व ओंकार मंत्राचा सराव केला. त्यांनी संजीवन निसर्गोपचारात दिल्या जाणाऱ्या विविध सुविधांची माहिती घेतली. संजीवनचे अध्यक्ष डॉ. संजय उगेमुगे यांनी केंद्रात उपलब्ध असलेल्या शरीर शुद्धीसाठी एनीमा, मसाज, मड बाथ, स्टीम बाथ, जीएच पॅक, किडनी पॅक, ऑस्टियोपॅथी, फिजियोथेरपी, योग, मेडिटेशन अशा सर्व उपचारांबद्दल माहिती दिली. याशिवाय, वृद्धापकाळात निरोगी




जीवनशैली राखण्यासाठी मौल्यवान टिप्सदेखील दिल्या. त्यांनी नैसर्गिक उपचारांचे महत्त्व सांगितले. संजीवन निसर्गोपचार आणि योग केंद्राचे संचालक डॉ. विश्वकर्मा यांनी सामूहिक ध्यानाचे सत्र घेतले. चंद्रकांत तिळगुळे यांनी सूत्रसंचालन केले. सर्व कर्मचारी व पदाधिका-यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.

# शेतमालकाच्या अंगावरील सोन्याच्या लोभातून सालगड्याने केला खून


## यल्लमवाडीतील घटना उघड

**मोहोळ । प्रतिनिधी**

मोहोळ तालुक्यातील यल्लमवाडी येथे शेतमालक कृष्णा नारायण चामे (वय ५२) यांची त्यांच्या सालगड्याने सोन्याच्या लोभातून निर्घृण हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना १४ डिसेंबर रोजी घडली असून, मोहोळ पोलिसांनी तात्काळ तपास करत संशयित आरोपी सचिन गिरी याला अटक केली आहे.

सचिन गिरी हा मागील दहा महिन्यांपासून चामे यांच्याकडे सालगडी म्हणून काम करत होता. त्याने आपल्या मालकाच्या अंगावरील सोन्याच्या लोभातून वस्तीवरील घरातच खून केला. खून लपवण्यासाठी मृतदेहाचे तुकडे करून ते घराच्या मागील शोष खड्ड्यात पुरले.

या प्रकरणाचा तपास करताना मोहोळ पोलिसांच्या पथकाने या गुन्ह्याचा छडा लावला आणि २२ डिसेंबर रोजी आरोपीला अटक करण्यात यश




मिळवले. घटनास्थळावरील पुरावे गोळा करून पोलिसांनी आरोपीविरुद्ध पुढील कारवाई सुरू केली आहे.

या घटनेमुळे यल्लमवाडी गावात खळबळ उडाली असून, पोलिसांच्या वेगवान तपासकार्याचे कौतुक होत आहे.

# राज्यात कायदा सुव्यवस्था ढसाळली:बाळासाहेब थोरात

**संगमनेर । प्रतिनिधी**

लोकशाही आणि संविधानाच्या नावावर निवडून सत्तेवर यायचे आणि त्यानंतर संविधानाची सर्व मूल्य पायदळी तुडवायची ही भाजपची नीती असून केंद्रीय मंत्री अमित शहा यांचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात केलेले वक्तव्य ही भाजपाची समाजविरोधी चालत आलेली कायमची प्रवृत्ती असल्याची टीका काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर केलेल्या वक्तव्याचा निषेध तसेच आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ता सोमनाथ सूर्यवंशी व बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांच्या अमानुषपणे झालेल्या मृत्यूच्या निषेधार्थ महाविकासह आघाडीच्यावतीने आयोजित निषेध आंदोलनात ते बोलत होते. यावेळी मा.आमदार डॉ.सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, शिवसेनेचे अमर कातारी, रिपाईचे बाळासाहेब गायकवाड, प्रा.हिरालाल पगडाल यांच्यासह काँग्रेस, शिवसेना, छात्रभारती, पुरोगामी संघटना, महाविकास आघाडी व विविध आंबेडकरवादी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून हे निषेध आंदोलन करण्यात आले.

परभणीमध्ये दलित कार्यकर्त्याचा कोठडीत मृत्यू होतो. त्याची खरी चौकशी झाली पाहिजे. त्याचप्रमाणे बीडमधील सरपंचाची हत्या करण्यात आली. यामागे कोण आहे, खरा आरोपी शोधले पाहिजे, या आरोपींना



संरक्षण मिळते की काय, अशी शंका आता निर्माण होत आहे.आंदोलन केले म्हणून मुंबई काँग्रेस कार्यालयावर हल्ला होतो .त्याचप्रमाणे केंद्रीय गृहमंत्र्यांच्या वक्तव्याचा निषेध करण्यास संसदेमध्ये जाण्यापासून खा. राहुल गांधी व इतरांना रोखले जाते. डॉ.आंबेडकर यांच्यावरील वक्तव्याच्या घटनेवरून प्रसिद्धी माध्यमांचे लक्ष दुसरीकडे नेण्यासाठी काहीतरी खोटी घटना दाखवून राहुल गांधी यांच्यावर खोटे गुन्हे टाकले जातात, हा काय न्याय आहे.

संविधान व लोकशाही वाचवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन काम करूया, असे आवाहन केले. मा.आ. डॉ.तांबे, रिपाई नेते बाळासाहेब गायकवाड , शिवसेनेचे अमर कतारी, प्रा. हिरालाल पगडाल, राजू खरात, अनुराधा आहेर, अनिकेत घुले यांनीही भाजपवर जोरदार टीका केली.यावेळी महाविकास आघाडी व पुरोगामी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ३१ डिसेंबरल साई समाधी मंदिर रात्रभर खुले




**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

श्री साईबाबा संस्थानच्यावतीने नाताळ सुट्टी, चालू वर्षाला निरोप व नवीन वर्षाच्या स्वागतानिमित्त शिर्डी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन समाधी मंदिर दि.३१ डिसेंबर रोजी दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्यात येणार असल्याची माहिती संस्थानचे प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी दिली.श्री.कोळेकर म्हणाले, दरवर्षी नाताळ सुट्टी, चालू वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागतानिमित्त श्रींच्या दर्शनासाठी शिर्डीत मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात.येणाऱ्या सर्व भाविकांना श्रींच्या समाधीच्या दर्शनाचा लाभ मिळावा व होणाऱ्या गर्दीचे नियोजन योग्यरितीने व्हावे, या उद्देशाने ३१ डिसेंबर रोजी श्रींचे समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्यात येणार आहे.त्यामुळे ३१ डिसेंबर रोजीची शेजारती व दि.१ जानेवारी रोजीची पहाटेची काकड आरती होणार नाही.तसेच नाताळ व नवर्षाच्या सुट्टीच्या गर्दीमुळे २५ डिसेंबर ते १ जानेवारी रोजी असे७ दिवस वाहन पूजा बंद राहतील.परंतु नाताळ सुट्टीचे कालावधीत श्री साईसत्यव्रत पूजा, अभिषेक पूजा सुरु राहील. मंदिर व परिसरात फटाके व वाद्य वाजविण्यास मनाई करण्यात आली असून, सुरक्षिततेच्या दृष्टीने शिस्तीचे पालन करण्याचे आवाहनही कोळेकर यांनी केले.

# सोन्याच्या लालसेने सालगड्याचा थरारक गुन्हा शेतमालकाचा खून करून मृतदेहाचे तुकडे पुरले

## मोहोळ तालुक्यातील यल्लमवाडी येथील धक्कादायक घटना

**मोहोळ । प्रतिनिधी**

मोहोळ तालुक्यातील यल्लमवाडी येथे शेतमालक कृष्णा नारायण चामे (वय ५२) यांचा त्यांच्या सालगड्याने खून करून मृतदेहाचे तुकडे पुरल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. सोन्याच्या लोभातून १४ डिसेंबर रोजी हा खून झाला. संशयित आरोपी सचिन गिरी हा गेल्या दहा महिन्यांपासून चामे यांच्या शेतावर सालगडी म्हणून काम करत होता. चामे यांच्या अंगावर असलेल्या सोन्यासाठी त्याने वस्तीवरील घरात खून केला. नंतर पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेहाचे तुकडे करून घराच्या मागील शोष खड्ड्यात पुरले.

या घटनेचा तपास करत मोहोळ पोलिसांनी २२ डिसेंबर रोजी आरोपी सचिन गिरी याला अटक केली आहे. पोलीस पथकाने सूक्ष्म तपास करून हा गुन्हा उघडकीस आणल्यामुळे परिसरात पोलीस प्रशासनाच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

या भयानक घटनेमुळे यल्लमवाडी गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलीस पुढील तपास करत आहेत.



# गाव जल परिपूर्ण करण्यासाठी ३० वर्षांचे सूक्ष्म नियोजन आवश्यक-डॉ.प्रवीण गेडाम

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शासनाच्या विविध योजनांचा प्रभावी उपयोग करून गावांना जल परिपूर्ण बनविण्यासाठी पुढील ३० वर्षांचे दीर्घकालीन आणि सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिले आहेत. गावाच्या पाण्याच्या गरजा पूर्ण करण्याबरोबरच नदी-नाल्यांना प्रवाही ठेवण्याचा विचारही नियोजनाचा भाग असावा, असे ते म्हणाले.

जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी (ता. २३) जलसंधारणाच्या कामांचा आढावा घेत असताना डॉ. गेडाम बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरिकर, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, अपर जिल्हाधिकारी प्रवीण महाजन, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी शाहुराज मोरे, आणि जिल्हा मृद व जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसामुद्रे यांसह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. डॉ. गेडाम यांनी सांगितले की, जल व्यवस्थापनासाठी दीर्घकालीन दृष्टीकोन आवश्यक आहे. गावांमध्ये पाण्याच्या उपलब्धतेवर आधारित सूक्ष्म नियोजन केल्यास जल संकटावर मात करता येईल. नदी-नाले प्रवाहित राहतील यासाठी जलसंधारणाच्या पायाभूत सुविधा उभारणे आणि जल पुनर्भरणावर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे. बैठकीत जिल्ह्यातील जलसंधारण प्रकल्पांची सद्यस्थिती आणि येणाऱ्या काळातील योजना यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. जल पुनर्भरण, जलाशयांचे पुनरुज्जीवन, आणि नवनवीन जलस्रोत निर्माण करण्याच्या दिशेने धोरणात्मक उपाययोजनांवर भर देण्यात आला. पाण्याच्या टंचाईला तोंड देण्यासाठी सूक्ष्म नियोजन हाच उपाय असल्याचे मत व्यक्त करत, डॉ. प्रवीण गेडाम यांनी गाव जल परिपूर्णतेसाठी दीर्घकालीन नियोजन करण्याचे आवाहन केले. त्यांच्या सूचनांमुळे जिल्ह्यातील जल व्यवस्थापनाच्या दिशेने ठोस पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# मंदिर संस्कृतीच्या रक्षणार्थ १ हजार यांहून अधिक प्रतिनिधी एकवटणार

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

आपल्या देशात 'सेक्युलर' वादी राज्यव्यवस्था स्वीकारल्यामुळे केवळ मंदिरांचे सरकारीकरण आणि त्या मंदिरांचा भ्रष्टाचार, पैसे घेऊन 'व्हीआयपी दर्शन, मंदिरांची भूमी बळकावणे, 'वक्फ बोर्ड' चे मंदिरांच्या भूमीवर अतिक्रमण चालू आहे.अशा वेळी मंदिर संस्कृतीचे रक्षण करणे हे हिंदू समाजाचे दायित्व आहे. त्यानुषंगाने मंदिराच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी महाराष्ट्र मंदिर महासंघ, मुंबई येथील श्री जिवदानी देवी संस्था, श्री ज्योतिर्लिंग भीमाशंकर देवस्थान, श्री साई पालखी निवारा आणि हिंदु जनजागृती समिति यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २४ आणि २५ डिसेंबरला शिर्डी येथील श्री साई पालखी निवारा येथे तृतीय 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे'चे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनिल घनवट यांनी दिली.

शिर्डी येथे महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी मालेगाव येथील श्री वैजनाथ महादेव देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष निवृत्त सेनाअधिकारी मेजर किसन गांगुर्डे, नाशिक गोरेराम मंदिराचे मालक दिनेश मुठे, साई पालखी निवारा शिर्डीचे कार्यालयीन व्यवस्थापक स्वप्नील शिंदे आणि हिंदु जनजागृती समितीचे समन्वयक प्रदीप देशमुख उपस्थित होते.

घनवट यांनी सांगितले की,आपल्या राजे-महाराजांनी मंदिरांची निर्मिती केली. छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी मंदिरांचे संरक्षण केले, तसेच आक्रमकांनी उद्धस्त केलेल्या मंदिरांचे जीर्णोद्धार केले. एकूणच मंदिरांच्या समस्यांचे निवारण करणे, मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी सुविधा उपलब्ध करून देणे, दर्शनरांगांचे सुनियोजन करणे, तसेच मंदिर परंपरांचे रक्षण करणे यासाठी मंदिरांचे विश्वस्त, पुजारी, भक्त आदींचे संघटन आवश्यक आहे. यासाठी या परिषदेचे आयोजन केले असून, या परिषदेला संपूर्ण महाराष्ट्रभरातून १ हजारांहून अधिक निमंत्रित मंदिराचे विश्वस्त, प्रतिनिधी, पुरोहित, मंदिरांच्या रक्षणासाठी लढा देणारे अधिवक्ते, अभ्यासक आदी सहभागी होणार आहेत.

फेब्रुवारी २०२३ जळगाव येथे पहिल्या 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदेत 'महाराष्ट्र मंदिर महासंघाची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर ओझर, पुणे येथे दुसरी परिषद झाली. त्यानंतर महासंघाचे कार्य उत्तरोत्तर




वाढत असून, दोन वर्षांच्या आत ते संपूर्ण राज्यभर पोचले आहे. महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या माध्यमातून राज्यात आठशेहून अधिक मंदिरांमध्ये वस्त्रसंहिता लागू करण्यात आली आहे, तर १५ हजारांहून अधिक मंदिरांचे देशभरात संघटन झाले आहे. राज्यात वक्फ बोर्डाने अनेक जमिनी बळकावल्या असून वक्फ कायदा रद्द झाला पाहिजे. राज्यात अँटी लँड ग्रॅबिंग ॲक्ट लागू करावा, अशी आमची प्रमुख मागणी आहे. एकाच धार्मियांचे मंदिरे सरकारच्या ताब्यात घेतली जातात, मग अन्य धार्मियांच्या का नाही, असा सवाल उपस्थित करत मंदिरात राजकीय हस्तक्षेप थांबला पाहिजे ,यासाठी ही राज्यस्तरीय परिषद असल्याचे त्यांनी म्हटले. या परिषदेसाठी 'हिंदू फ्रंट फॉर जस्टिस'चे प्रवक्ते आणि सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता विष्णु जैन, स्वातंत्र्यवीर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष रणजीत सावरकर, संपादक प्रसाद काथे, जैन मंदिराचे गिरीश शहा डॉ.अमित थढाणी, लेखक संदीप सिंह, बाणगंगा ट्रस्टचे ऋत्विक औरंगाबादकर यासह श्री अष्टविनायक मंदिरांचे विश्वस्त, महाराष्ट्रातील जोतिर्लिंग देवस्थानांचे विश्वस्त, संतपिठांचे प्रतिनिधी, अन्य मंदिरांचे विश्वस्त, हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते रमेश शिंदे आदी मान्यवर सहभागी होणार आहेत.या मंदिर परिषदेत मान्यवरांचे मार्गदर्शन, मंदिरांशी निगडीत 'मंदिरे सनातन धर्मप्रचाराची केंद्रे बनवणे', 'मंदिरे सरकारीकरण मुक्त करणे', 'वक्फ कायद्या'द्वारे मंदिरांच्या भूमीवर अतिक्रमण आणि मंदिरे बळकावणे यावर उपाय, मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे यांच्या परिसरात मद्य-मांस बंदी, दुर्लक्षित मंदिरांचा जीर्णोद्धार आदी विषयांवर चर्चा होणार आहे.

### साई मंदिरात ड्रेस कोड लागू होणार ?

**देशाचे पंतप्रधान मंदिरात जाताना नियम पाळतात तर सर्वसामान्य माणसांनी का पाळू नये, मंदिरात ड्रेस कोड लागू करण्यासाठी आम्ही सरकारकडे मागणी केली आहे. भाविकांची गैरसोय झाली नाही पाहिजे.सर्वधर्म समभावाची शिकवण देणाऱ्या देशातील नंबर दोनचे श्रीमंत देवस्थान असलेल्या शिर्डी येथील श्री साईमंदिरात ड्रेस कोड लागू करावा, अशी आग्रही मागणी शिर्डीतील या परिषदेत असणार आहे.**


**-सुनील घनवट,राष्ट्रीय संघटक,मंदिर महासंघ.**

# हदगाव येथे श्रीकृष्ण मंदिराचा ऐतिहासिक कलशारोहण सोहळा

## महानुभाव संप्रदायाच्या परंपरेचा जागर योगीराज बाबांच्या नेतृत्वाखाली आयोजन

**नांदेड । बालाजी पाटील**

हदगाव येथे सुमारे पाचशे वर्षांपूर्वी श्री देव उखळाई या विशेष शक्तीची स्थापना करण्यात आली. या ठिकाणी महानुभाव संप्रदायाच्या संत परंपरेचा वारसा पुढे नेणाऱ्या कैवल्यवासी गुरुवर्य श्री दत्ता बापू यांनी धार्मिक आणि सामाजिक कार्यातून या क्षेत्राला ओळख मिळवून दिली. १८ पगड जातींतील भक्तवर्गाने त्यांच्या कार्याचा साक्षीदार राहून या आश्रमाच्या विकासासाठी सहकार्य केले.



दत्ता बापू यांच्या निधनानंतर त्यांचे उत्तराधिकारी योगीराज बाबा यांनी आश्रमाची आणि श्रीकृष्ण मंदिराची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे श्रीकृष्ण मंदिराचा कलशारोहण सोहळा आता प्रत्यक्षात साकार होणार आहे.

योगीराज बाबांनी या सोहळ्याचे निमंत्रण थेट महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले, आणि त्यांनी ते नम्रतेने स्वीकारले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री यांच्या हस्ते हा ऐतिहासिक कलशारोहण सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या तयारीसाठी योगीराज बाबा आणि भक्तगण अहोरात्र मेहनत घेत आहेत. हदगाव येथे होणाऱ्या या सोहळ्यामुळे महानुभाव संप्रदायामध्ये आनंदाचे वातावरण आहे. कैवल्यवासी दत्ता बापू यांच्या कार्याचा गौरव करीत संप्रदायातील हजारो भक्तगण या कार्यक्रमासाठी सज्ज झाले आहेत. हा सोहळा हदगावच्या धार्मिक परंपरेला नवी उंची देईल आणि संत परंपरेच्या कार्याचा गौरवपर्व ठरेल.

## बुधवारी डॉ.मोहन भागवत चंद्रपूरात

# सन्मित्र सैनिकी विद्यालयाचा वार्षिकोत्सव



**चंद्रपूर ब्युरो । प्रतिनिधी**

मागील २९ वर्षांपासून विद्यार्थ्यांमध्ये सैनिकी मूल्ये रुजविणाऱ्या सन्मित्र सैनिकी विद्यालयाचा वार्षिकोत्सव बुधवार, २५ डिसेंबर २०२४ रोजी शाळेच्या परिसरात आयोजित केला जाणार आहे. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक*डॉ.मोहन भागवत*प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सन्मित्र मंडळाचे अध्यक्ष *डॉ.परमानंद अंदनकर*तर सचिव *ॲड. निलेश चोरे* यांचीही उपस्थिती राहणार आहे, अशी माहिती शाळेच्या प्राचार्या *अरुंधती कावडकर* यांनी सोमवारी (दि. २३) दिली.कार्यक्रमादरम्यान शाळेच्या दैनंदिन शिक्षणातून दिल्या जाणाऱ्या सैनिकी प्रशिक्षणाची प्रात्यक्षिके सादर केली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.यावेळी समदेशक *कमांडरसुरींदरकुमार राणा*आणि विद्यार्थी नायक *भानुदास वाढणकर*यांचीही उपस्थिती होती.

# पारनेर ग्रामपंचायत निधी कपातीच्या रकमेत मोठा गैरव्यवहार

**पारनेर । प्रतिनिधी**

तालुक्यातील पारनेर पंचायत समिती अंतर्गत असणाऱ्या ग्रामपंचायतच्या निधीतून शासकीय कपातीच्या रक्कमेचा अपहार झालेला असताना ग्रामपंचायत निहाय दप्तर तपासणी करुन फेर लेखापरी क्षण विभागीय आयुक्त नाशिक यांच्या स्तरावरुन करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे.सदर प्रश्नी कारवाई न झाल्यास प्रजासत्ताक दिनी २६ जानेवारी रोजी जिल्हा परिषदे समोर आंदोलन करण्याचा इशारा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.




पारनेर तालुक्यातील पारनेर पंचायत समिती अंतर्गत असणाऱ्या ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत निहाय कामाची यादी ती कामे पूर्ण झाल्याबाबत व त्या कामाच्या शासकीय कपातीच्या रकमेचे चलन पावत्या याची माहिती देण्यास जाणीवपूर्वक दिरंगाई करण्यात आलेली आहे.पंचायत समितीचे ग्रामविकास अधिकारी यांनी कर्मचारी यांच्याशी संगनमत करून शासकीय कपातीची काही ग्रामपंचायतीची रक्कम हडप केली असल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.

ग्रामविकास अधिकारी यांच्यावर निलंबनाची कारवाई करून, त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, विभागीय आयुक्त नाशिक यांच्या स्तरावरून पारनेर पंचायत समिती अंतर्गत २०२१ ते आज आखेर पर्यंतचे मंजूर कामे,पूर्ण झालेल्या कामाच्या शासकीय कपातीच्या रक्कमेची दप्तर तपासणी करुन करुन फेर लेखापरीक्षण विभागीय आयुक्त नाशिक यांच्या स्तरावरुन करावे,त्यातील दोषी ग्रामविकास अधिकारी,इतर अधिकारी व कर्मचारी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# नवभारत साक्षरता सर्वेक्षणासाठी शिक्षकांवर दबाव टाकू नये; शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नवभारत साक्षरता सर्वेक्षणावर शिक्षकांचा बहिष्कार कायम ठेवत असताना शिक्षण विभागाने शिक्षकांवर दबाव टाकू नये, या मागणीचे निवेदन मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर संघटना समन्वय समितीच्या वतीने माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या भोर व कार्यालयीन अधीक्षक महावीर धोदाड यांना देण्यात आले.



अहमदनगर जिल्हा मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर संघटनेच्या वतीने २२ ऑगस्ट रोजी एक पत्र देऊन शालाबाह्य कामांवरील नवभारत साक्षरता सर्वेक्षणावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला होता. तथापि, काही तालुक्यांमध्ये गट शिक्षणाधिकारी व मुख्याध्यापक शिक्षकांना नवभारत साक्षरता सर्वेक्षणासाठी दबाव टाकत असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

सध्या सर्व शाळांमध्ये पदभरती न झाल्यामुळे निम्मे शिक्षक कार्यरत आहेत, तसेच काही शिक्षकांना बीएलओचे काम देण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे आधार अपडेट, आधार कार्ड काढणे, वाचन प्रकल्प, घटक चाचणी परीक्षा, विविध शिष्यवृत्तीचे अर्ज भरणे अशा कामांमध्ये शिक्षक व्यस्त आहेत. यामुळे नवभारत साक्षरता सर्वेक्षणावर शिक्षकांचा बहिष्कार कायम राहणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

शालेबाह्य कामे शिक्षकांवर लादली जात असताना, मुख्याध्यापक व शिक्षकांवर दबाव टाकणे उचित नाही, अशी मागणी मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर संघटना समन्वय समितीच्या वतीने केली आहे.

# राष्ट्रीय शेतकरी दिन:बळीराजाच्या संघर्षाला सलाम

**प्रशांत टेके पाटील । प्रतिनिधी**

राष्ट्रीय शेतकरी दिन हा दिवस फक्त उत्सव साजरा करण्याचा नाही, तर आपल्याला अन्न देणाऱ्या बळीराजाचे ऋण मान्य करण्याचा दिवस आहे. जगाच्या पोषणाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतलेला हा कष्टकरी शेतकरी राजा म्हणजेच खऱ्या अर्थाने जगाचा पोशिंदा.

शेतकरी राजा कधीही थकतो नाही, हार मानत नाही. पेरणीपासून सोंगणीपर्यंत निसर्गाच्या अनिश्चिततेशी झगडत तो आपले कर्तव्य पार पाडतो. पिके तयार होण्यापूर्वीच कोसळणाऱ्या अवकाळी पावसाचे संकट, हवेतील बदलांमुळे होणारे कीड-रोग, रानटी प्राण्यांमुळे होणारी हानी-यावर मात करण्यासाठी बळीराजा रात्रीचा दिवस करतो. उन्हात, थंडीत, पावसात शेतकरी आपली श्रमयात्रा सुरू ठेवतो. मात्र, एवढ्या कष्टांनंतरही त्याच्या ताटात पोटभर अन्न असेल, याची हमी नसते. तरीही, तो कुरबूर करत नाही. हा आत्मविश्वासच त्याला बळीराजा बनवतो.



प्रशांत टेके पाटील

बळीराजाला आसमानी संकटे म्हणजे निसर्गाची लहरीपणा सहन करावा लागतो. अवकाळी पाऊस, गारपीट, ढगाळ हवामान यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. त्यातच कीड-रोगांवर फवारणीसाठी महागडी कीटकनाशके खरेदी करणे त्याच्या खिशाला परवडत नाही. याशिवाय, सुलतानी संकटे म्हणजे बाजारातील शेतमालाच्या कमी किंमती, सावकारांच्या कर्जाचा बोजा, सरकारी धोरणांतील उदासीनता यांचा सामना बळीराजाला रोज करावा लागतो. शेतात घाम गाळून तयार केलेला माल बाजारात नेला, तरी त्याला उत्पादन खर्चही परत मिळेल एवढी किंमत मिळत नाही. त्यामुळे त्याला बाजारात मिळेल त्या भावात शेतमाल विकावा लागतो, जेणेकरून तो कर्ज फेडू शकेल. शेतकऱ्यांना केवळ कर्जमाफी दिल्याने त्यांच्या समस्या सुटणार नाहीत. शासनाने शेतकऱ्यांच्या अडचणी समजून त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढला पाहिजे. उत्पादन खर्चाच्या आधारावर शेतमालाला हमीभाव देण्याचा कायदा केला पाहिजे.

शेतमालाला योग्य बाजारभाव मिळाल्यास शेतकरी स्वतःचे आर्थिक गणित सुधारून कुटुंबाचा उदरनिर्वाह सन्मानाने करू शकेल. मुलाबाळांचे आरोग्य, शिक्षण यासाठीही तो योग्य व्यवस्था करू शकेल. शेतकऱ्याच्या कष्टांना न्याय देण्यासाठी आणि त्यांच्या जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे.

आजचा राष्ट्रीय शेतकरी दिन हा फक्त शुभेच्छा देण्यापुरता मर्यादित न राहता शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी ठोस पावले उचलण्याचा निर्धार करण्याचा दिवस ठरला पाहिजे. बळीराजा हा केवळ शेतकरी नसून, तो आपल्या देशाचा आत्मा आहे. त्याच्या कष्टांना, संघर्षाला आणि त्यागाला योग्य ओळख देण्यासाठी शासन, समाज, आणि आपण सर्वांनी पुढाकार घेतला पाहिजे. बळीराजाचा सन्मान हा फक्त त्याच्या नावाने नाही, तर त्याच्या श्रमाला न्याय देऊन करावा लागेल.




सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# पशुधन विकले जातेय कवडीमोल भावाने

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शेतातील उत्पन्नाला बाजारात भाव नाही तर दुसरीकडे दुधाचे बाजारभाव घटल्याने पशुखाद्यांच्या किमती कमालीच्या घटल्या आहेत. गाईच्या दुधाचा भाव उतरल्याने एक लिटर बाटलीबंद पाण्याच्या दरात दूध विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर ओढावली आहे.त्यामुळे शेतकऱ्यांची होत असलेली पिळवणूक नव्याने स्थापन झालेले सरकार थांबविणार का, असा प्रश्न शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.फॅट ३.५ व ८.५ एसएनएफ दुधाला ५ रूपये अनुदान देण्याचे शासनाने यापूर्वीच जाहीर केले आहे. मात्र, प्रत्यक्षात ही घोषणा कागदावरच राहिल्याने दूध व्यवसाय शेवटच्या घटका मोजत आहे. जनावरांच्या खुराकाच्या वाढलेल्या किमती व चाऱ्याचा विचार केला तर शेतकऱ्यांना एक लिटर दूध उत्पादनासाठी तब्बल २५ रुपयांपर्यंत खर्च येतो. मात्र, हेच दूध सध्या २२ ते २६ रुपये दराने विकले जात असल्याने शेतकऱ्यांना मोठा तोटा सहन करावा लागत आहे. दुसरीकडे जनावरांना लागणारा खुराकाचे भाव गगनाला भिडले आहेत. सर्वच शेतकरी खुराक चारू शकत नसल्याने दुधामध्ये मोठ्या प्रमाणात घट येत आहे.शेतकऱ्यांना त्याचा मोठा फटका सहन करावा लागत आहे तसेच पशुखाद्यासह कडब्याच्या दरात वाढ झाल्याने आधीच संकटात सापडलेल्या दूध उत्पादकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.३.५ फॅट व ८.५ एसएनएफ असणाऱ्या गायीच्या दुधाला २६ रुपये दर दिला जात आहे. प्रत्यक्षात राज्य सरकारने दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या निर्मिती व विक्रीवर कोणतेही निर्बंध लादले नाहीत. मात्र, प्राप्त परिस्थितीचा फायदा उचलत दूध संस्था दूध उत्पादक शेतकऱ्यांची पिळवणूक करत आहेत.दुधासह शेतमालाचे भाव घसरले असल्याने पशुपालक शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शेतीबरोबर पशुपालन व्यवसाय संकटात सापडला असून दुधाचा भाव ४३ रुपयांवरून २० रुपयांपर्यंत खाली आलेला आहे. मात्र, दुसऱ्या बाजूने जनावरांसाठी आवश्यक पेंडी, भूसा याचे भाव गगनाला भिडल्यामुळे दुग्ध व्यवसाय धोक्यात आलेला आहे. त्यात शेतकरी मेटाकुटीला आलेला आहे.एक लिटर बिसलरीचे पाणी बनविण्यासाठी पॅकिंगसह तीन रुपये खर्च येतो. मात्र, बाजारात बिसलरी २० ते ३० रुपये लिटरने मिळते. एक लिटर दुधाला २५ रुपये उत्पादन खर्च येतो. मात्र, त्याचा दर २२ ते २६ रुपये मिळतो. हे अन्यायकारकच आहे. नव्याने स्थापन झालेल्या सरकारने दूध उत्पादक शेतकऱ्यांना न्याय द्यावा.पशुधन कवडीमोल भावाने विक्रीची शेतकऱ्यांवर वेळदोन वर्षांपूर्वी परराज्यातून अहिल्यानगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गायी शेतकऱ्यांनी विकत घेतल्या याला कारण म्हणजे त्यावेळी ४५ रूपये एक लिटरला बाजारभाव मिळत होता. दरम्यानच्या काळात शासनाने अनुदान सुरू केले तेही काही शेतकऱ्यांना मिळाले तर काही शेतकरी अद्याप वंचित आहेत. दुधाचे बाजारभाव घटल्याने याच गायांचे गोठे शेतकऱ्यांनी रिकामे करण्यास सुरुवात केली. दुधाला बाजारभावही नाही व गाई विक्रीची संख्या वाढल्याने १ लाख ६० हजारांना विकणारी गाय सध्या बाजारात ३० ते ६० हजार रुपये विकली जात असल्याने सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या गाईंना कवडीमोल बाजारभाव मिळत आहे.



# एचएफ गाईच्या किमती झाल्या निम्म्याने कमी

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील पशुपालक शेतकऱ्यांसाठी चिंतेची बातमी आहे. होस्टन व जर्सी या दुभत्या जनावराच्या किमती निम्म्याने खाली आल्या आहेत, ज्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे.

कोरोना महामारीनंतर शहरांमध्ये नोकरी करणारे अनेक तरुण आपल्या गावी पशुपालनामध्ये रमले होते, त्यामुळे जिल्ह्यातील दुधाच्या उत्पादनात वाढ झाली आहे. शेतकऱ्यांनी शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालनावर भर दिला होता, आणि शेतीला सेंद्रिय खत व शेती कामासाठी दुग्ध उत्पादनातून पैसा मिळवू लागला होता. अनेक शेतकऱ्यांनी शेतात बिऱ्हाड मांडून नवे प्रयोग सुरू केले, पण त्यांच्यासमोरील संकट कमी होत नाही.



दुग्ध व्यवसायाच्या तेजीत असतानाही उत्पादन वाढल्याने दुधाचे भाव घटले आहेत. गेल्या दोन महिन्यांत दुग्ध व्यवसायाशी संबंधित किमती दुपटीने वाढल्या आहेत. दुखत्या जनावरांना लागणारे सकस खाद्य – सुग्रास, पेंड, भुसा यांच्या किमती वाढल्या आहेत, तर दुसरीकडे दुधाचे दर कमी झाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना खर्च आणि उत्पादनाचे संतुलन साधताना अडचणी येत आहेत.

या संकटाच्या पार्श्वभूमीवर अनेक शेतकऱ्यांना चांगल्या दुखत्यांचा विक्री करण्याची गरज पडली आहे. होस्टन व जर्सी गाईंच्या किमती आधी लाखाच्या आसपास होत्या, पण आता त्या ५० ते ६० हजारांपर्यंत विकल्या जात आहेत.

शेतीतील चाऱ्याचा पुरवठा देखील कमी झाला आहे. खरिपात मोठ्या प्रमाणावर तूर आणि रब्बी हंगामात हरभरा व गव्हाची लागवड झाली आहे. ज्वारीचे क्षेत्र घटल्यामुळे कडब्याची टंचाई निर्माण होणार आहे, ज्यामुळे चाऱ्याच्या किमती आणखी वाढण्याची शक्यता आहे.

भविष्यातील संभाव्य संकट ओळखून अनेक शेतकऱ्यांनी असलेल्या गाई विकून देण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांनी दुधाचे भाव वाढवण्यासाठी शासनाकडे मागणी केली आहे.

# संजय गांधी निराधार योजनेसह विविध प्रलंबित प्रकरणे मार्गी लावा

**संगमनेर । प्रतिनिधी**

संगमनेर तालुका हा विस्ताराने मोठा असूनही लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली विविध गावांमधील योग्य लाभार्थ्यांना शासनाच्या सुविधांचा लाभ मिळवून दिला आहे.मात्र मागील अनेक दिवसांपासून लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेली अनेक प्रकरणे प्रलंबित असून ते तात्काळ मार्गी लावून तालुक्यातील निराधार ,वृद्ध व गोरगरीब , नागरिकांना दिलासा द्यावा अशी आग्रही मागणी काँग्रेसच्या शिष्टमंडळाच्या वतीने करण्यात आली आहे.प्रांताधिकारी कार्यालय येथे काँग्रेसने विविध प्रलंबित प्रकरणे मार्गी लावावे याकरता निवेदन दिले. यावेळी माजी नगराध्यक्ष सौ दुर्गाताई तांबे, शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे, गणेश मादास ,नितीन अभंग, किशोर पवार,गजेंद्र अभंग, शैलेश कलंत्री ,जालिंदर लहामगे, विजय उदावंत ,दशरथ भुजबळ ,रमेश नेहे, संजय कानवडे, सुभाष दिघे ,सौदामिनी कान्होरे, सुनीता कांदळकर, किशोर बोऱ्हाडे आदींसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.या निवेदनात म्हटले आहे की काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली गोरगरिबांसाठी विविध योजनांचा लाभ



मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केला. मात्र मागील काही महिन्यांमध्ये अनेक प्रकरने प्रलंबित ठेवली गेली.त्यामुळे तालुक्यातील वृद्ध नागरिक निराधार गोरगरीब यांची मोठे हाल झाले आहेत. संजय गांधी निराधार योजना इंदिरा गांधी निराधार योजना श्रावण बाळ वृद्ध काळ योजना यामधील अनेक प्रकारचे प्रलंबित असूनतातडीने ही सर्व प्रकरणे मंजूर करावी त्याचप्रमाणे या प्रकरणांच्या कामी दाखल्याची अट २१हजारांवरून ५० हजार रुपये करण्यात यावी. त्यामुळे वंचित असलेल्या लाभार्थी आणि त्यांच्या दैनंदिन जीवनातील अडीअडचणी सोडवण्यासाठी मोठी मदत होईल.यावेळी सौ दुर्गाताई तांबे म्हणाल्या की, समाजातील निराधार ,अपंग, वृद्ध व्यक्तींना औषध उपचाराची गरज असते आणि त्याकरता या योजना त्यांच्याकरता अत्यंत महत्त्वपूर्ण असतात.

मात्र मागील काही दिवसांपासून या योजनांमधून लाभार्थ्यांना पैसे न मिळाल्याने या नागरिकांची हाल होत आहे. तरी तातडीने सर्व प्रकरणे मंजूर करावी अशी मागणी त्यांनी केली

तर संजय गांधी निराधार योजनेचे माजी अध्यक्ष गजेंद्र अभंग म्हणाले की संजय गांधी योजनेचे साडेनऊशे प्रकार ने प्रलंबित आहेत. ते तातडीने मंजूर करून निराधार व्यक्तींना लाभ द्यावा अशी मागणी त्यांनी केली. याप्रसंगी काँग्रेसचे विविध पदाधिकारी, व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुणे जिल्ह्यातील तहसीलदारांना शेतरस्ते खुले करण्याच्या सूचना–उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांचे आश्वासन

**पारनेर । प्रतिनिधी**

शेतरस्त्यांचा प्रश्न महाराष्ट्रात गंभीर स्वरूप धारण करत आहे. शेतरस्त्यांच्या कारणावरून भावाभावात वाद वाढत आहेत, तसेच फौजदारी स्वरूपाच्या घटनांमध्येही वाढ होत आहे. भविष्यातील संभाव्य अनर्थ टाळण्यासाठी आणि शेवटच्या शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळ उभी राहिली आहे. चळवळीचे प्रणेते शरद पवळे आणि राज्य समन्वयक दादासाहेब जंगले यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या समस्यांवर न्यायालयीन आणि प्रशासकीय पातळीवर तोडगा काढण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केलेल्या निवेदनात, प्रलंबित शेतरस्ता प्रकरणे निकाली काढण्याचे, शेतरस्त्यांचे सर्वेक्षण करून अडथळा निर्माण करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे, तसेच नकाशावरील



शेतरस्त्यांचे संरक्षण शुल्क बंद करण्याचे प्रस्ताव मांडले आहेत. शेतरस्त्यांअभावी शेतीत अडचणी येत असल्याने विनाअट नुकसानभरपाई देण्याची मागणीही करण्यात आली आहे. याशिवाय ग्रामस्तरीय शेतरस्ता समित्यांची स्थापना करून त्यांचा कार्यवाही अहवाल शासनाला सादर करावा, असेही चळवळीच्या वतीने नमूद करण्यात आले. प्रशासनाने यावर कार्यवाही केली नाही, तर ६ जानेवारी २०२५ रोजी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांकडून पेरू वाटप आंदोलन करण्यात येईल, असा ठाम इशारा दिला आहे. शेतकऱ्यांच्या निवेदनाची दखल घेत पुणे निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयांना प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याच्या सूचना देण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, प्रत्यक्ष कार्यवाही न झाल्यास मोठे आंदोलन उभे करण्यात येईल, असा इशारा चळवळीच्या नेत्यांनी दिला आहे.

तुकड्यात विभागल्या जाणाऱ्या शेतीसाठी, तसेच शेतीमाल वाहतूक, यंत्रसामग्री पोहोचवणे, आपत्कालीन परिस्थितीत मदत पोहोचवणे यासाठी बारमाही दर्जेदार शेतरस्ते अत्यावश्यक असल्याचे या चळवळीत अधोरेखित करण्यात आले. शेतकऱ्यांच्या शेतीसाठी शेतरस्ते नसेल, तर शेतीतील उत्पादकता आणि सुविधा यावर गंभीर परिणाम होतो.

या आंदोलनासाठी शरद पवळे, दादासाहेब जंगले, सुरेश वाळके, शांताराम पानमंद, युवराज कानसकर, दत्तात्रय बांगर, अविनाश नळकांडे, रामदास नळकांडे, राहुल शिंदे, लक्ष्मण धुमाळ, बाळासाहेब वाळके, ओमकार नळकांडे आदी शेतकरी उपस्थित होते. शेततिथे रस्ता हा आमचा निर्धार आहे, तो पूर्ण होईपर्यंत संघर्ष सुरूच राहील, असे शेतकऱ्यांनी ठामपणे सांगितले

# वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत जल जीवनच्या कामांची तपासणी करा-खा.नीलेश लंके यांच्या सुचना



**पारनेर । प्रतिनिधी**

जल जीवन योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या पाणी योजनांच्या कामांची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्याच्या सुचना खासदार नीलेश लंके यांनी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांना दिल्या. जल जीवन मिशन योजनेअंतर्गत जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या पाणी योजनांबाबत अनेक तक्रारी येत आहेत, आणि खा. लंके यांच्या चौकशीच्या सुचनेमुळे ठेकेदारांमध्ये खळबळ उडाली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीची बैठक पार पडली. यामध्ये खासदार भाऊसाहेब वाकचौरे व सहअध्यक्ष नीलेश लंके यांच्यासह जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी अशिष येरेकर, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे संचालक राहुल शेळके यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत केंद्र पुरस्कृत योजनांचा आढावा घेतला गेला. खा. लंके यांनी सांगितले की, मंजूर घरकुलांसाठी लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून द्याव्यात आणि पीक विमा योजनेची रक्कम बँकेच्या खात्यावर परस्पर वर्ग करण्यापासून टाळावे. तसेच प्रधानमंत्री खनिज क्षेत्र योजनेत चांगली कामे करता येतील, अशी त्यांची सूचनाही होती. खा. वाकचौरे यांनी लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांमध्ये सुसंवाद ठेवून केंद्र पुरस्कृत योजनांचा अधिकाधिक लाभ घेण्यावर भर देण्याचे सांगितले. यावेळी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीच्या अडचणी लक्षात घेता आवश्यक बदलांसाठी प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश दिले. जिल्हाधिकारी सालीमठ यांनी सांगितले की, घरकुलांच्या ६,३०५ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून दिली आहे आणि उर्वरित ३९८ लाभार्थ्यांना लवकरच जागा मिळेल.

# संगमनेर मधील नद्यांच्या संवर्धन व सुशोभीकरण निधी द्या:आ.तांबे

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

संगमनेरमधील प्रवरा, म्हाळुंगी आणि आधाळा या गोदावरीच्या उपनद्या असून, या नद्यांच्या संवर्धन, सुशोभीकरण आणि पुनरुज्जीवनासाठी भरीव निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी सभागृहात केली.



वाढतं नदीकाठचे शहरीकरण, प्रक्रिया न झालेले सांडपाणी आणि नद्यांमध्ये टाकले जाणारे कचरा यामुळे नद्यांमध्ये प्रदूषण वाढले आहे. त्यामुळे नद्यांचा 'अमृतवाहिनी नदी पुनरुज्जीवन आणि विकास प्रकल्प' अंतर्गत विकास व पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे. या नद्यांच्या संवर्धनासाठी नगर पालिकेने राज्य सरकारकडे साडे तीनशे कोटी रुपये निधीचा प्रस्ताव दिला असल्याचे आ. तांबे यांनी स्पष्ट केले.

आ. तांबे म्हणाले, महाकुंभ मेळ्यास एक ते दीड वर्षांचा अवधी शिल्लक आहे. संगमनेरचा हा परिसर दंडकारण्याचा असल्याने येथे हजारो पर्यटक येतात. या नद्यांच्या सुधारणा करण्यासाठी राज्य सरकारने साडे तीनशे कोटी रुपये निधी नगर पालिकेला द्यावा. यामुळे संगमनेरमधील धार्मिक, सामजिक आणि शैक्षणिक विकासास मदत होईल. यापूर्वीही आ. तांबे यांनी नद्यांच्या विकासासाठी आणि पुनरुज्जीवनासाठी निधी उपलब्ध करण्याची मागणी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्याकडे केली होती

## महापालिका अक्शन मोडवर

# मालमत्ताकराच्या थकबाकी पोटी दोन मालमत्ता सील

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या थकबाकी वसुलीसाठी महानगरपालिकेने आक्रमक कारवाईला सुरुवात केली आहे.

मंगळवारी दिवसभरात महानगरपालिकेच्या सावेडी प्रभाग कार्यालयाने नगर मनमाड रस्त्यावरील व बालिकाश्रम रस्त्यावरील मालमत्ता थकबाकी पोटी सील केली आहे. शहरातील मालमत्ताधारकांनी त्यांच्याकडील थकीत कराचा भरणा करून जप्तीसारखी कारवाई टाळावी, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

उपायुक्त प्रियंका शिंदे यांच्या उपस्थितीत सावेडी प्रभाग अधिकारी बबनराव काळे, कर संकलन अधिकारी विनायकराव जोशी, कर निरीक्षक ऋषिकेश लखापती, तसेच वसुली लिपिक संजय तायडे, संदीप कोलते, राजेश आनंद, सागर जाधव, किशोर देठे, शंकर अवघडे, गोरक्ष ठुबे यांच्या पथकाने मार्क स्केवर अपार्टमेंट येथील तिसरा मजल्यावर असलेले झेड के बॉलीवूड कॅफे ४ लाख २ हजार ७६२ रुपयांच्या थकबाकीपोटी सील करण्यात आले आहे. भिंगारदिवे मळा, बालिकाश्रम रोड येथील मालमत्ताधारक भागवत यांचा गणपतीचा कारखाना २ लाख ३० हजार १९७ रुपयांच्या थकबाकीपोटी सील करण्यात आला आहे.

सिव्हिल हडको येथील मालमत्ताधारक शांतीलाल दत्तात्रय औटी यांच्याकडे असलेल्या मालमत्ता कराच्या २ लाख



५१ हजार ८७९ रुपयांच्या थकबाकी पोटी महानगरपालिकेच्या पथकाने कारवाई सुरू करताच त्यांनी आठवड्याभरात संपूर्ण रक्कम भरण्याची तयारी दर्शवली. त्यामुळे त्यांच्यावरील कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली. तसेच, मालमत्ताधारक लिलाबाई धोंडीराम राठोड यांच्या संभाजीनगर रोडवरील हॉटेल मातोश्रीची मालमत्ता करायची थकबाकी १ लाख ४३ हजार ४७२ रुपये असल्याने त्यांच्यावरही कारवाई प्रस्तावित करण्यात आली. त्यांनीही आठवडाभरात संपूर्ण रक्कम भरण्याची तयारी दर्शवल्याने त्यांच्यावरील कारवाई स्थगित करण्यात आली. ज्या मालमत्ताधारकाकडे मालमत्ता कराची थकबाकी असेल, त्यांनी स्वतः येऊन मनपात जमा करावी, अन्यथा कारवाईला समोर जावे लागेल, असा इशारा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे.

## मनमाड रस्त्याच्या कामाच्या अपेक्षा वाढल्या

# या रस्त्याच्या कामासाठी २५०० कोटी रुपयांची तरतूद केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरींची माहिती



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

गेल्या कित्येक दिवसापासून रखडलेल्या अहिल्यानगर ते मनमाड महामार्गाच्या कामाला आता वेग येईल आणि काही दिवसांनी त्याचे काम सुरु होण्याची शक्यता असून गेल्या कित्येक दिवसापासून अतिशय बिकट अवस्थेत असलेला हा महामार्ग अनेक लोकांच्या मृत्यूला देखील कारणीभूत ठरलेला आहे. परंतु आता लवकरात लवकर या महामार्गाचे काम सुरू होईल अशी अपेक्षा आहे व त्यामागील प्रमुख कारण म्हणजे नुकतेच शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी याबाबत संसदेत प्रश्न उपस्थित केला होता व या प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटले की,

अहिल्यानगर ते मनमाड या महामार्गाची दखल आपण घेतली असून त्याकरिता येणाऱ्या आठ दिवसांमध्ये अधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यावर मार्ग काढून या महामार्गाच्या कामासाठी २५०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली जाईल. त्यामुळे आता यामहामार्गाच्या कामाच्या बाबतीत घडामोडींना काही दिवसात वेग येऊन या महामार्गाचे काम सुरू होईल अशी शक्यता निर्माण झाली आहे. या अगोदर दोनदा काढल्या होत्या या महामार्गाच्या कामाच्या निविदा अहिल्यानगर ते मनमाड महामार्गाच्या कामाच्या बाबतीत दोन वेळा निविदा काढल्या होत्या. तेव्हा हे काम बीओटी तत्त्वावर सुरू होणार होते. परंतु निविदा या कमी दराने भरल्या गेल्या. तसेच मध्यंतरीच्या कालावधीमध्ये दोन ठेकेदारांनी अर्धवट काम सोडले. इतकेच नाही तर एका बँकेने खोटी बँक हमी दिल्यामुळे अनेक अपघात होऊन निष्पापांचे बळी यामध्ये गेले. त्यावेळी त्या दोन्ही ठेकेदारांवर कारवाई सुरू केल्या. परंतु आता येणाऱ्या पुढील पंधरा दिवसांमध्ये रस्त्याच्या दुरुस्तीचे काम केले जाणार असल्याच्या वावड्या उठवल्या होत्या.

या सगळया पार्श्वभूमीवर संसदेच्या हिवाळी अधिवेशनात शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी या महामार्गाबाबत केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांना तारांकित प्रश्न विचारला व त्यावेळी नितीन गडकरी यांनी उत्तर देताना वरील माहिती दिली.या प्रश्नाला उत्तर देताना नितीन गडकरी यांनी म्हटले की, या मार्गावर शिर्डीला जाणाऱ्या साईभक्तांची ये जा मोठ्या प्रमाणावर असते व तो रस्ता खराब असल्यामुळे आम्हाला त्यांचा मोठा संकोच वाटत असून त्याकरिता आम्ही आता एक अल्पकालावधी निविदा जारी केली व त्यासाठी २५०० कोटींची निविदा बोलावली. त्यातून आता सदर काम निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन दोन महिन्यात सुरू होईल असा विश्वास खासदार वाकचौरे यांना त्यांच्या माध्यमातून देण्यात आला. या अगोदर या रस्त्यासाठी अनेकदा प्रयत्न झाले.

मध्यंतरीच्या कालावधीत तीन ठेकेदार पळून गेले व आता दोन ठेकेदारांनी निविदा भरल्या. परंतु त्यामध्ये देखील पुन्हा तीच परिस्थिती उद्भवली. तोपर्यंत आता रस्त्याची डागडुजी करण्याचे आदेश दिले व त्यानंतर सदर रस्त्याचे काँक्रिटीकरण करून त्याचे काम पूर्ण केले जाईल असे देखील त्यांनी सांगितले

## जि.प.प्रा.शाळा,अस्तगांव येथे मोठ्या उत्सवात वाढदिवस साजरा

**शिर्डी । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अस्तगाव येथील विद्यार्थ्यांना वही व खाऊचे वाटप करण्यात आले,त्याच बरोबर इयत्ता दुसरीच्या दोन वर्गासाठी चप्पल व शूज ठेवण्यासाठी चप्पल स्टॅन्ड बनवून देण्यात आले, तसेच यावेळी श्रेयस व त्यांच्या पालकाचा सत्कार करून व केक कापून त्याचा वाढदिवस साजरा करण्यात आला



यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,अस्तगावचे मुख्याध्यापक सहाने ,एक नंबर सोसायटी चेअरमन विजयराव गोर्डे पाटील,ओबीसी सेलचे प्रदेश सरचिटणीस नंदू जेजुरकर,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष साहेबराव सापते,अस्तगावचे पोलीस पाटील राजेश त्रिभुवन, भाजपा दिव्यांग सेलचे तालुकाध्यक्ष हेमंतराजे गोर्डे,जेष्ठ नेते बशीर शेख,काँग्रेस नेते शरदराव चोळके, आरपीआय नेते अनिल त्रिभुवन,समद शेख, आरपीआय शहराध्यक्ष महेश त्रिभुवन,भीमा त्रिभुवन,मिथुन संसारे,सौरभ त्रिभुवन,राकेश त्रिभुवन, अशोक गोडगे,कमलेश त्रिभुवन, राष्ट्रीय श्रीराम संघाचे उपाध्यक्ष महेश त्रिभुवन, वादे पाटील, कर्डिले, गमे, सगभोर, कहाणे ,गीते , जाधव, पंडित ,भुतकर , दातीर ,निळे ,मोरे ,जॉन त्रिभुवन आदीसह मोठ्या प्रमाणात जिल्हा परिषद प्रा.शाळेचे विद्यार्थी व मित्रपरिवार उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष हेमंतराजे गोर्डे, कर्डिले आदींची भाषणे झाली, श्रेयशच्या वाढदिवसानिमित्त केलेल्या या उपक्रमाबद्दल शाळेतील मुख्याध्यापक व श्रेयसचे व त्याच्या पालकांचे कौतुक करण्यात आले.गमे यांनी सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले,तर जॉन त्रिभुवन यांनी सर्वांचे आभार मानले.

## गृहमंत्री अमित शाह यांचा निषेध

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा निवेदन

**भंडारा । प्रतिनिधी**

दिनांक २३ डिसेंबर २०२४ रोजी भंडारा येथे, शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर प्रणित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या विधानाचा तीव्र निषेध केला. समितीच्या विविध सदस्यांनी जिल्हा अधीक्षक रोहिणी पाठराबे यांच्यामार्फत भारताचे राष्ट्रपती आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना निवेदन पाठवले. या निवेदनात गृहमंत्री अमित शाह यांनी भारतीय संसदेमध्ये केलेल्या विधानावर चिंता व्यक्त करण्यात आली. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख करताना आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर, एक फॅशन हो गया है! असे अवैज्ञानिक शब्द वापरले. यामुळे समाजातील नागरिकांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आहेत, असे सांगितले. डॉ. आंबेडकर यांचा अपमान करणे हे अत्यंत गंभीर आहे, असे समितीच्या सदस्यांचे मत आहे.




या संदर्भात, गृहमंत्री अमित शाह यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात समितीचे अध्यक्ष हर्षल मेश्राम, प्रा. युवराज खोब्रागडे, चंद्रशेखर भिवगडे, नितेश बोरकर, लीलाधर बनसोड, राज्य सहकार्य वाह विष्णुदास लोणारे, चंद्रशेखर खोब्रागडे, पुरुषोत्तम गायधणे, भीमराव रामटेके, बंडू ढेंगे, जयश्री फुटाणे, शोभना शेंडे, प्रेमलता जनबंधू ,रवींद्र शेंडे, कॉम्रेड हिवराज उके ,उज्वला शेंडे, संगीता जनबंधू कृतिका शेंडे, संध्या शेंडे, यांनी निवेदन दिले. संविधान जिंदाबाद, संविधान जिंदाबाद! अशा घोषणा देण्यात आल्या. यांसारख्या अनेक प्रमुख व्यक्तींचा समावेश आहे. या सर्वांनी एकत्र येऊन संविधानाच्या मूल्यांचे रक्षण करण्याचे आश्वासन दिले आहे.

## कांदा उत्पादकांची ६२ लाखांची फसवणूक

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील नेवासा येथे तालुक्यातील १६कांदा उत्पादकांची ६२ लाख रुपयांची कांदा व्यापार्याने फसवणूक केल्याप्रकरणी नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकारामुळे कांदा शेतकर्यांमध्ये खळबळ उडाली आहे.



याबाबत तालुक्यातील साईनाथनगर येथील बाळासाहेब भाऊसाहेब पेचे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले, चुलतभाऊ विठ्ठल गिताराम पेचे यांच्याकडून उंदिरगाव (ता. श्रीरामपूर) येथील कांदा व्यापारी सुहास अनिल बांद्रे याने काही दिवसांपूर्वी १५ टन कांदा खरेदी केला होता. त्याचे सर्व पैसेही दिले. याच व्यापार्याने माझ्याबरोबर सप्टेंबरमध्ये ४१ रूपये प्रतिकिलोनुसार कांदा खरेदीचा व्यवहार केला. माझा १६ टन ६१९ किलो कांदा त्याने खरेदी करून नेला. या कांद्याच्या रकमेचा धनादेश देण्यात आला. त्याप्रमाणे १३ ऑक्टोबर रोजी दिलेला धनादेश बँकेत भरला.तो पैसे नसल्याने वटला नाही. यासंदर्भात व्यापारी बांद्रे याच्याशी संपर्क केला. उंदिरगावला त्याच्या घरीही बर्याचसा चौकशी केली. परंतु त्यांची भेट झाली नाही. आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात येताच नेवासा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. माझ्यासह परिसरातील नेवासा बुद्रुक, पाचेगाव, जैऊर हैबती, बेलपांढरी आदी भागांतील १६ कांदा शेतकर्यांचीही या व्यापार्याने ६१ लाख ७४ हजार ६५० रूपयांची आर्थिक फसवणूक केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी पोलिसांनी व्यापार्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. अधिक तपास पोलिस निरीक्षक धनंजय जाधव करीत आहेत.

## घरी जाऊन शासकीय योजनांचा लाभ देण्याचा संकल्प: जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ




**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

प्रशासनाने सकारात्मकता दाखविली तर अशक्य गोष्ट शक्य होते. प्रशासनातील सकारात्मक दृष्टीकोनाचा वापर करत नागरिकांच्या घरी जाऊन शासकीय योजनांचा लाभ देण्याचा संकल्प आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले. अकोले तालुक्यातील मवेशी गावात सुशासन सप्ताहांतर्गत आयोजित 'प्रशासन गांव की ओर' या अभियानात मार्गदर्शन करताना ते बोलत होते.याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, संगमनेर उपविभागीय अधिकारी शैलेश हिंगे,उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ, राहुल शेळके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, राजूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी मनोज ससे, तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे, गटविकास अधिकारी अमर माने आदी उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकार्यांनी मवेशी गावातील ग्रामस्थ, महिला, पुरूष व तरुणांच्या समस्या जाणून घेतल्या.

## सोलापूर जिल्हा कलाध्यापक संघाची नूतन कार्यकारिणी जाहीर

**सोलापूर । प्रतिनिधी**

सोलापूर जिल्हा कलाध्यापक संघाच्या बैठकीत नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळ पुणे संलग्न असलेल्या या संघाच्या अध्यक्षपदी श्री गणेश ईरय्या तडका (कुचन प्रशाला) यांची निवड करण्यात आली, तर सचिवपदी मुकुंद हरीहर मोरे (ज.रा. चंडक प्रशाला) यांची निवड झाली. या पदाधिकाऱ्यांची निवड तीन वर्षांसाठी करण्यात आली आहे.

पुणे विभागीय कार्यवाह आणि माजी अध्यक्ष दिपक कन्ना यांनी नूतन अध्यक्ष व सचिव यांचे अभिनंदन केले. संघटनेतील इतर प्रमुख पदाधिकाऱ्यांची निवड देखील करण्यात आली असून, उपाध्यक्ष, शहर व ग्रामीण अध्यक्ष, सचिव तसेच कार्यवाहक सदस्यांची सूची जाहीर करण्यात आली आहे.राज्याध्यक्ष नरेंद्र बारई, राज्य उपाध्यक्ष बलराम सामंत, राज्य सचिव दिगंबर बेंडाळे आणि अन्य राज्य पदाधिकाऱ्यांनी नव्या कार्यकारिणीचे अभिनंदन केले. माजी अध्यक्ष आणि राज्य सल्लागार पी आर पाटील, काझी सर, दादा भगाटे, हिरामण पाटील यांनी नव्या पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. नूतन कार्यकारिणीच्या नेतृत्वाखाली संघाने आगामी तीन वर्षांसाठी विविध कलाध्यापकांच्या हितासाठी कार्य करण्याची योजना जाहीर केली आहे.

## महानगरपालिकेच्या बुरुडगाव रस्त्यावरील अद्ययावत रुग्णालयाच्या इमारतीचे काम अंतिम टप्प्यात

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेतून बुरुडगाव रस्त्यावरील महानगरपालिकेच्या जागेत उभारण्यात येत असलेल्या नवीन अद्ययावत रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले आहे.

सद्यस्थितीत ७५ टक्के बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित कामालाही गती देण्यात आली असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

आयुक्त यशवंत डांगे यांनी मंगळवारी या कामाची पाहणी करून आढावा घेतला. चाहुराणा बुद्रुक स.नं.४६/१ या जागेमध्ये अद्यावत रुग्णालय बांधण्यात येत आहे. त्यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी २३.८४ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. इमारतीमध्ये तळघर, तळमजला व त्यावर चार मजल्यांची इमारत बांधण्यात येत आहे. तळघरात पार्किंग, तळ मजल्यावर ओपीडी व लॅब, पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर जनरल वॉर्ड, आयसीयु व ऑपरेशन थिएटर, तिसऱ्या मजल्यावर प्रायव्हेट रूम, डॉक्टर कक्ष, चौथ्या मजल्यावर कॅन्टीन, सेमीनर हॉल, डॉक्टर कक्ष असणार आहे. इमारतीत नागरीक, रुग्णांसाठी २ पॅसेंजर लिफ्ट व १ स्ट्रेचर लिफ्ट असणार आहे.



१०० बेडचे रुग्णालय असून आरसीसी बांधकाम, प्लॅस्टरचे काम पूर्ण झाले आहे. तसेच, आतील बाजूने दुसऱ्या मजल्यापर्यंत टाईल्सचे काम पूर्ण झाले आहे. जिन्याच्या ग्रॅनाईटचे संपर्ण बिल्डींगचे काम पूर्ण केले असून, आगप्रतीबांधक उपाययोजनांचे अंतर्गत लाईनचे संपूर्ण मजल्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. दुसऱ्या मजल्यापर्यंत प्लंबींगचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित कामांना गती देण्यात आली आहे.

महानगरपालिकेने या कामापोटी ठेकेदार संस्थेला आत्तापर्यंत १८.८५ कोटींची बिले अदा केली आहेत. इमारतीला संरक्षक भिंत, परिसर सुशोभिरण व मुख्य रस्त्याला जोड रस्ते यासाठी ३.१७ कोटींचा खर्च येणार आहे. त्यासाठीही कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. नागरी स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसुचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविणे या लेखाशिर्षा अंतर्गत फर्निचर व्यवस्था, डिजीटलायजेशन व आयटी सोल्युशनसह बिल्डींग पूर्ण करण्याकरीता ३.३५ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच, रुग्णालयाच्या उभारणीनंतर तेथे आवश्यक असणारे वैद्यकीय अधिकारी, इतर वैद्यकीय कर्मचारी, लॅब टेक्निशियन व इतर मनुष्यबळ आऊटसोर्सिंगद्वारे भरण्यात येणार आहेत. नागरिकांना चांगल्या दर्जाची आरोग्य सेवा देण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले आहे.

## पतंग व मांजा विक्रेत्यांविरोधात महानगरपालिकेची कडक कारवाई

## नायलॉन मांजा विक्रीवर प्रतिबंध

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

मकरसंक्रांतीच्या सणाच्या निमित्ताने पतंग शौकिनांमध्ये पतंगबाजीला विशेष महत्त्व दिलं जातं. या दरम्यान काही जण नायलॉन मांजाचा वापर करत असल्यामुळे अनेक नागरिक व पशुपक्ष्यांना धोका निर्माण होतो. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासनाने कडक पावलं उचलली आहेत.



महानगरपालिकेने नायलॉन मांजा विक्रीवर प्रतिबंध घालण्यासाठी प्रतिबंधात्मक नोटिसा विक्रेत्यांना बजावल्या आहेत. तोफखाना, बागडपट्टीसह शहरातील अन्य ठिकाणी ज्या ठिकाणी पतंग व मांजा विक्री होत असते, त्याठिकाणी देखील नोटिसा दिल्या आहेत. यापुढे नायलॉन मांजा विक्री करतांना आढळल्यास विक्रेत्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करून २५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल, अशी माहिती आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

नायलॉन मांजा वापरण्यामुळे दरवर्षी अनेक नागरिक जखमी होतात आणि पशुपक्ष्यांचा मृत्यू होतो. यामुळे या मांजाच्या वापरावर राज्यात बंदी घालण्यात आली आहे. आयुक्त यशवंत डांगे यांनी नागरिकांना नायलॉन मांजाचा वापर टाळण्याचे आवाहन केले आहे.

महानगरपालिकेने विक्रेत्यांना चेतावणी दिली आहे की, बंदी असलेल्या नायलॉन मांजाची विक्री न करता सामाजिक भान राखावे. बंदीचे उल्लंघन करतांना आढळल्यास २५ हजार रुपयांचा दंड व फौजदारी कारवाई करण्यात येईल. याशिवाय, महानगरपालिकेच्या वतीने जानेवारी अखेरपर्यंत तपासणी व कारवाई सुरू ठेवण्यात येणार आहे

# हिंदू धर्मकार्य, गो रक्षणाबद्दल आ.संग्राम जगताप यांचे मोठे विधान,नेमकं काय म्हणाले

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत सर्वांच्या मतरुपी आशीर्वादाने मला तिसऱ्यांदा विजय संपादन करता आला आहे. माझ्या विजयाने नगरकरांच्या खूप मोठ्या अपेक्षा वाढल्या आहेत. जनतेच्या सर्व अपेक्षा शहर विकासाच्या माध्यमातून पूर्ण करणार आहेच. यासाठी सर्वांना एकत्रितपणे बरोबर घेत शहराच्या विकाससाठी काम करून हिंदू धर्मकार्य व गो रक्षणासाठीही काम करणार आहे, असे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले.शहरात सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या जय आनंद फाउंडेशनच्या वतीने आ.संग्राम जगताप यांनी गो रक्षणासाठी घेतलेल्या पुढाकारा बद्दल आनंदधाम जवळील अहिंसा चौकातील गो वास्त्सल्य शिल्पा जवळ त्यांचा सत्कार करून 'गो रक्षक आमदार' ही उपाधी दिली. यावेळी सत्कारास उत्तर देताना आ.जगताप बोलत होते. यावेळी जय आनंद फाउंडेशनचे संस्थापक कमलेश भंडारी, अध्यक्ष अमित काबरा, माजी नगरसेवक विपुल शेटीया,प्रकाश भागानगरे, सीए. किरण भंडारी, रितेश पारख, गौरव बोरा आदींसह जय आनंद फाउंडेशनचे सर्व सदस्य उपस्थित होते. यावेळी हिंदू धर्माच्या व गो मातेच्या जयजय काराच्या घोषणा उपस्थितांनी दिल्या.

आ,जगताप पुढे म्हणाले, नगर शहर ही साधू संतांची भूमी आहे. राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराजांनी अहिंसा परमो धर्माची शिकवण आपल्याला दिली आहे. त्यांच्या समाधी जवळील या चौकाचे जय आनंद फाउंडेशने अहिंसा चौक नामकरण करून गो वास्त्सल्याचे सुरेख शिल्प येथे उभारून महाराजांचा संदेश प्रत्यक्षात आणला आहे. हा चौक व शिल्प गो संवार्धांसाठी प्रेरक ठरत आहे. आता गो मातेच्या रक्षणाची वेळ आली आहे. महायुतीच्या सरकारने देशी गायींना राज्य मातेचा दर्जा दिला आहे. भविष्यात नगर जिल्हा गो हत्या मुक्त करण्यासाठी जास्तीत जास्त गोमातेचे रक्षण करण्यासाठी सर्वांबरोबर माझाही पुढाकार असणार आहे. गोरक्षकांच्या मागेही खंबीरपणे उभे राहून त्यांना सहकार्य करणार आहे.

प्रास्ताविकात कमलेश भंडारी म्हणाले, आ.संग्राम जगताप यांच्या विजयी हॅटट्रिकने नगरकरांच्या खूप अपेक्षा वाढल्या आहेत. या अपेक्षा पूर्ण करण्यास आ.जगताप सक्षम आहेतच. आता त्यांनी गो रक्षणासाठी ही पुढाकार घेत जिल्हा गो हत्या मुक्त करण्याची भूमिका घेतली आहे. हे आमच्यासाठी खूप आनंदायी आहे. त्यामुळेच त्यांना अहिंसा चौकात 'गो रक्षक आमदार' ही उपाधी देत त्यांचा सन्मान करून त्यांच्या या कार्यात सहभागी होणार आहोत. गोमातेच्या आशीर्वादाने त्यांना हुलकावणी दिलेले मंत्रिपदही लवकरच मिळेल, अशी मला खात्री आहे.

यावेळी सुमीत लोढा, कुणाल बडजाते, गौतम मुथा, नीलेश पोखरणा, सुनील गुगळे, सुभाष कर्नावट, अतुल शिंगवी, राहुल सोनीमंडलेचा, मनीष फूलडहाळे, अतुल कावळे आदींसह जय आनंद फाउंडेशनचे सर्व सदस्य उपस्थित होते.



## नगर अर्बन बँक घोटाळा: न्यायालयाचा मोठा निर्णय,माजी व्हाईस चेअरमन व संचालकांना अटकपूर्व जामीन नाकारला

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**




नगर अर्बन को ऑपरेटिव्ह मल्टिस्टेट बँकेतील २९१ कोटी रुपयांच्या कर्ज घोटाळ्याचे प्रकरण न्यायालयात महत्त्वाचे वळण घेत आहे. बँकेचे माजी व्हाईस चेअरमन शैलेश मुनोत व माजी संचालक दिनेश कटारिया यांचे अटकपूर्व जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. एच. शेख यांच्या न्यायालयाने फेटाळले आहेत.

बँकेतील घोटाळा प्रकरणी रिझर्व्ह बँकेने बँकेचा बँकिंग परवाना रद्द केला आहे. या घोटाळ्यात बँकेने कोट्यावधी रुपयांचे कर्ज दिले होते, जे अद्याप वसूल झालेले नाही. २९१ कोटी रुपयांच्या कर्ज घोटाळ्यामुळे बँकेच्या इतर गैरव्यवहारांचा पर्दाफाश झाला आहे. यामध्ये सोने तारण संदर्भातील घोटाळा आणि बँकेच्या इतर आर्थिक प्रक्रियांमध्ये भ्रष्टाचाराचा समावेश आहे. या संदर्भात विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सध्या नगरचे आर्थिक गुन्हा शाखेचे पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

माजी व्हाईस चेअरमन शैलेश मुनोत व माजी संचालक दिनेश कटारिया (गुजरात) यांनी न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केले होते. त्यांना आरोप आहे की बँकेच्या आर्थिक गैरव्यवहारात त्यांचा हात होता आणि त्यांनी वेळेवर कर्ज वसूल केले असते, तर बँक बचावली असती.

फिर्यादी राजेंद्र गांधी यांच्या वतीने ज्येष्ठ ड. अभिजीत पुप्पाल यांनी युक्तिवाद केला की, बँकेच्या घोटाळ्यामुळे सामान्य ठेवीदारांचे मोठ्या प्रमाणावर पैसे अडकले आहेत. या घोटाळ्याचे स्वरूप अतिशय गंभीर आहे. बँकेच्या संचालक मंडळाने योग्य वेळी कर्ज वसूल करणे आवश्यक होते, मात्र त्यांनी ते केले नाही. त्यामुळे बँकेला नुकसान सहन करावे लागले, आणि अनेक खातेदारांचे पैसे अडकले आहेत.

याआधी, जेव्हा बँकेच्या संचालक मंडळावर लेखा परीक्षणाच्या आधारावर ताशेरे ओढण्यात आले होते, तेव्हा रिझर्व्ह बँकेने देखील बँकेच्या व्यवस्थापनावर कठोर शब्दांत प्रतिक्रिया दिली होती. बँकेचे आजी-माजी संचालक या सर्व गोष्टींसाठी जबाबदार ठरले होते. या गंभीर प्रकरणावर न्यायालयाने शैलेश मुनोत व दिनेश कटारियाचे जामीन अर्ज फेटाळले आहेत.

न्यायालयाने यापूर्वी देखील चार माजी संचालकांचे जामीन अर्ज फेटाळले होते. या संचालकांनी नियमांचे उल्लंघन केले होते, ज्यामुळे बँकेचा परवाना रिझर्व्ह बँकेने रद्द केला. या प्रकरणामुळे बँकेतील खातेदारांची मोठी आर्थिक हानी झाली आहे, ज्यासाठी हे संचालक प्रत्यक्षपणे जबाबदार आहेत.

न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून, अटकपूर्व जामीन अर्ज नाकारले आणि या प्रकरणातील तपास अजूनही चालू आहे

## रस्त्याचे अपूर्ण काम आणि दोषांची पुनरावृत्ती:दीड वर्षांनंतर फोडकाम सुरू

**हिंगणघाट । प्रतिनिधी**



शहरातील रस्त्यांच्या कामांमुळे पुन्हा वाहतूक कोंडी आणि नागरी सुविधांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शिवाजी चौक ते जुना पाणी चौक दरम्यानच्या सिमेंटीकरण व रुंदीकरणाच्या कामासाठी २० कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. मात्र, हे काम अजूनही पूर्ण झालेले नाही आणि वारंवार रस्ता फोडण्याची वेळ आली आहे, ज्यामुळे नागरिकांना अनावश्यक त्रास सहन करावा लागत आहे.

शिवाजी चौक ते आर्वी नाका आणि आर्वी नाका ते जुना पाणी चौक या ३ किमी लांबीच्या रस्त्याचे सिमेंटीकरण आणि रुंदीकरण कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने जे. पी. कन्स्ट्रक्शन कंपनीला दिली. प्रत्यक्षात हे काम वर्ध्याच्या माया तिवारी यांनी केले. कोरोनापूर्वी सुरू झालेल्या या कामांचे मोठे दोष आढळले आहेत. नाल्यांचे बांधकाम आणि पेव्हर ब्लॉक टाकण्याचे काम अजूनही प्रलंबित आहे, आणि यावर आरोप झाल्यानंतर शासनाने ४५ ठिकाणी रस्ता फोडून नव्याने बांधकाम करण्याचे आदेश दिले होते.मे २०२२ मध्ये रस्त्याचे काही भाग फोडून दुरुस्ती करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर कामाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केले आणि कंत्राटदारानेही जबाबदारी झटकली. दीड वर्षांनंतर पुन्हा २३ ठिकाणी रस्त्याचे बांधकाम दुरुस्त करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे, ज्यामुळे पुन्हा वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता आहे.सदोष कामे समोर आल्यानंतरही, इतर रस्त्यांच्या कामांसाठी पुन्हा जे. पी. कन्स्ट्रक्शन कंपनीला कंत्राट देण्यात आले आहे. या कामांमध्येही त्रुटी आढळल्याने संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तथापि, नागरिक विचारत आहेत की, इतर रस्त्यांच्या कामांची चौकशी होणार का?वारंवार अपूर्ण आणि दोषपूर्ण काम करणाऱ्या कंत्राटदारांवर कडक कारवाई केली जात नसल्यामुळे नागरी सुविधांवर परिणाम होत आहे. प्रशासनाची निष्क्रियता आणि कंत्राटदारांच्या हलगर्जीपणामुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय होत आहे, हे स्पष्टपणे समोर आले आहे. नागरिकांना होणाऱ्या गैरसोयींचा विचार करून प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलणे आवश्यक आहे.

## ब्रिलीअंट स्कूल हिंगणघाट येथे कर्मयोगी गाडगेबाबांना आदरांजली अर्पण



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

विद्या विकास शिक्षण संस्था हिंगणघाट द्वारा संचालित ब्रिलीअंट स्कूल हिंगणघाट येथे कर्मयोगी गाडगेबाबा यांच्या स्मृतिदिनानिमित्त आदरांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी ब्रिलीअंट स्कूल हिंगणघाटचे मुख्याध्यापक अभय दांडेकर अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात प्रतिमापूजन करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी गाडगे महाराजांबद्दल आपल्या भावना व्यक्त करत, त्यांच्या शिकवणींचे महत्त्व सांगितले आणि त्यांना अभिवादन केले. अध्यक्षीय मनोगतातून अभय दांडेकर यांनी गाडगेबाबांच्या शिकवणुकीप्रमाणे जीवनात आचरण ठेवणे हिच खरी आदरांजली असल्याचे सांगितले. त्यांनी सर्वांना गाडगेबाबांच्या विचारांचा मानव बनण्याचा प्रयत्न करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका विद्या येनोरकर यांनी केले, तर आभार शिक्षिका नभा उरकुडकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी आपले सहकार्य दिले.

## बालदिन ते नाताळ या थंडीच्या दरम्यान मायेची ऊब फाउंडेशनची गोड गरिबांना मायेची ऊब

**शिरूर । प्रतिनिधी**



मायेची ऊब फाउंडेशन ही संस्था शहरातील अनाथ आणि गरिबांना थंडीपासून वाचवण्यासाठी पुढाकार घेत आहे. या उद्देशाने संस्थेने १४ नोव्हेंबर २०२४ रोजी विविध ठिकाणी गरजूंना उबदार कपड्यांचे वाटप कार्यक्रम आयोजित केले होते. यामध्ये स्वेटर, जैकेट्स, मौजे, टोपी अशा विविध प्रकारचे उबदार कपडे वाटप करण्यात आले.

राज्यभर थंडीचा जोर वाढत असताना समाजातील दुर्बल वंचित कुटुंबातील सदस्यांसाठी उबदार कपड्यांचे वितरण केले. या उपक्रमात पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात दि. १४ नोव्हेंबर बालदिनाच्या दिवशी कोंढापुरी येथील आशीर्वाद अनाथालयातील मुलांना साहित्य वाटप करून कार्यक्रमाची सुरुवात केली. १९ डिसेंबर रोजी फदालेवाडी येथील आदिवासी शाळेतील मुलांना साहित्य वितरित करून कार्यक्रमाची सांगता झाली. तसेच शिरूर भागातील गणेशखिंड, भिसांबा, ठाकरवाडी, कडूस कातकरी वस्ती, उगलेवडी, अहिल्यानगर, गजरमालवाडी, भिल्ल वस्ती व वांगदरी येथील एकूण २०० मुलांपर्यंत ही उबदार भेट पोहचवली.या सामाजिक उपक्रमासाठी संस्थेचे अण्णासाहेब शेळके, उमेश धुमाळ, विकास हजारे, कुणाल नवले, चंद्रकांत खैरे, अशोक कर्डिले, त्रिंबक भाकरे, विजय गोडसे, संतोष विधाते, रामचंद्र नवले, बिभिषण गांजे, गोरख काळे, जयश्री वाजगे, सविता थोरात, अनिता गोसावी, राजश्री मोठे, कांताराम शिंदे, खंडेराव होळकर, रोहिदास बांदल, रमेश पावडे, राजेंद्र वाखारे, नानासो गर्जे, पोपट गांधले, विद्या सोनार आणि प्रमिला साठे यांनी संपूर्ण जबाबदारी स्वीकारली.सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून मागील दहा वर्षापासून हा उपक्रम सुरू आहे. या सामाजिक कार्याबाबत प्रबोधन केंद्राचे संस्थापक उत्तम अण्णा भोंडवे, शिरूर तालुका ग्रंथालय संघाचे अध्यक्ष विवेकानंद फंड, महाराष्ट्र साहित्य परिषद शिरूरचे अध्यक्ष मनोहर परदेशी, रोटरी क्लब ऑफ शिक्रापुरचे अध्यक्ष विठ्ठल वाघ आणि बालकुमार साहित्य संस्थेचे राज्य प्रतिनिधी सचिन बेंडभर यांनी संस्थेचे कौतुक केले आहे.या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी फाउंडेशनचे मुख्य समन्वयक अनिल पलांडे, शांताराम नेहरे आणि मच्छिंद्र झांजरे यांचे अनमोल सहकार्य लाभले. या उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे अध्यक्ष राहुल चातुर आणि कार्याध्यक्ष कल्याण कोकाटे यांनी आभार मानले. यापुढील काळात देखील हे कार्य अधिक विस्तृत स्वरूपात सुरू राहणार असल्याची माहिती उपाध्यक्ष मंगल लागे व सचिन ललिता भुजबळ यांनी दिली.

## नागपूर विमानतळ धावपट्टी दुरुस्तीतील दिरंगाईबद्दल गडकरींची जनतेची माफी

**नागपूर । प्रतिनिधी**




नागपूर विमानतळावरील धावपट्टीच्या दुरुस्तीच्या कामात विलंब होत असल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूरकरांची जाहीर माफी मागितली आहे. धावपट्टीच्या रिकार्पेटिंगच्या कामाची पाहणी करताना त्यांनी हा विलंब निष्काळजीपणाचा परिणाम असल्याचे नमूद केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागपूर विमानतळावरील रनवेच्या दुरुस्तीच्या कामासाठी २०२४ मे महिन्यात के जी गुप्ता कंपनीला जबाबदारी दिली गेली होती. मात्र, अजूनही काम अपूर्ण असल्याने प्रवाशांना विमान कंपन्यांच्या शेड्यूल बदलाचा आणि तिकिटदर वाढीचा सामना करावा लागत आहे. गडकरी यांनी या कामातील संथगतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आणि लवकरात लवकर काम पूर्ण करण्याचे आदेश दिले.

यावेळी गडकरी म्हणाले, मी दोन वर्षांत १,३७० किमी लांबीचा दिल्ली-मुंबई एक्स्प्रेसवे पूर्ण केला, पण तीन किमीच्या धावपट्टीच्या कामाला दीड वर्ष लागणे हास्यास्पद आहे. नागपूर विमानतळावरील या संथगतीमुळे प्रवाशांच्या गैरसोयीसाठी त्यांनी नागपूरकरांची जाहीर माफी मागितली. गडकरी यांनी एअरपोर्ट ऑथॉरिटी आणि मिहानच्या अधिकाऱ्यांसोबत बैठकीत कामाचा आढावा घेतला. धावपट्टीच्या दुरुस्तीचे काम जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले आणि नागपूरच्या विमान सेवांवर होणाऱ्या परिणामांबाबत नाराजी व्यक्त केली.गडकरींच्या या पुढाकारामुळे नागपूर विमानतळावरील धावपट्टीचे काम लवकर पूर्ण होण्याची अपेक्षा आहे, जेणेकरून प्रवाशांना विमान सेवांचा त्रास होणार नाही.

## शरीरावरील टॅटूमुळे नोकरीस अपात्र ठरवणे बेकायदेशीर–न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय

**नागपूर । प्रतिनिधी**



आजच्या तरुण पिढीत शरीरावर टॅटू काढणे ही एक लोकप्रिय गोष्ट झाली आहे. मात्र, याच टॅटूमुळे सीआरपीएफने एका तरुणाला नोकरीस अपात्र ठरवले. निखिल गर्डे नावाच्या तरुणाने या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाद मागितली. शरीरावर टॅटू असल्याने नोकरीस अपात्र ठरवण्याचा निर्णय योग्य आहे का, यावर न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे.

निखिल गर्डेने सीआरपीएफ कॉन्स्टेबल ड्रायव्हर पदासाठी परीक्षा उत्तीर्ण केली होती. मात्र, वैद्यकीय तपासणीदरम्यान त्याच्या उजव्या हातावर 'एन' अक्षराचा टॅटू असल्याचे आढळले. त्यामुळे सीआरपीएफने त्याला अपात्र ठरवले. यानंतर लेसर उपचाराद्वारे टॅटू काढून टाकल्यानंतरही निखिलला पुनरावलोकन चाचणीत अपात्र ठरवण्यात आले.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्पष्ट केले की केवळ शरीरावर टॅटू असल्यामुळे उमेदवाराला नोकरीस अपात्र ठरवणे बेकायदेशीर आहे. न्या. नितीन सांबरे आणि न्या. वृषाली जोशी यांच्या खंडपीठाने यावर निर्णय देताना सीआरपीएफच्या आदेशाला रद्द केले. लेसर उपचाराद्वारे टॅटू काढण्यात आला असून उमेदवार इतर कोणत्याही निकषांवर अपात्र नाही, असेही न्यायालयाने नमूद केले.न्यायालयाने सीआरपीएफला आदेश दिले की, निखिल गर्डेला इतर कोणत्याही कारणाने अपात्र ठरवले गेले नसेल, तर त्याची नियुक्ती चार आठवड्यांच्या आत केली जावी. याचिकाकर्त्याच्या वतीने ड. अमित बालपांडे यांनी बाजू मांडली तर सीआरपीएफची बाजू ड. व्ही.ए. ब्रह्मे यांनी मांडली.हा निर्णय तरुण पिढीसाठी महत्त्वाचा ठरला आहे, कारण शरीरावरील टॅटूमुळे नोकरीच्या संधी हिरावल्या जाण्याच्या भीतीला न्यायालयाने समाप्ती दिली आहे.

# शेतकऱ्यांना नुसत्याच राष्ट्रीय किसान दिनाच्या शुभेच्छा नकोय,त्यांना शेतीमालास योग्य भाव मिळणे आवश्यक!

**शिरूर अनंतपाळ । प्रतिनिधी**

कृषिप्रधान देशातील शेतकऱ्यांच्या आर्थिक संकटाचे वास्तविक कारण समजून घेतल्याशिवाय शासन नुसत्याच योजनांची घोषणा करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे हास्यास्पद धोरण राबवते. सध्याच्या सरकारची धोरणे शेतकऱ्यांना फसवून त्यांची आर्थिक परिस्थिती आणखी बिघडवतात. शासनाच्या शेतीमाल आयात धोरणामुळे, शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या भावात घट होत आहे, आणि त्याचे परिणाम शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपर्यंत पोहोचले आहेत.आवश्यक वस्तू कायद्यात केलेल्या बदलांमुळे सरकारने शेतकऱ्यांच्या शेतीमालावर निर्यात बंदी घालून परदेशातून शेती धान्य आयात केली आहे. यामुळे भारतीय शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य किंमत मिळत नाही. शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाचा विचार न करता बाजारभाव ठरवणे, हे त्यांची आर्थिक कोंडी अजून खोलवते.

आज देखील सरकार शेतकऱ्यांना फक्त काही क्षणिक योजना देऊन, त्यांची खरी समस्या सोडवत नाही. खरंतर, योग्य भाव मिळण्यासाठी शेतकऱ्याला शेतीमालाचे नियंत्रण हवे. शेतकऱ्यांच्या शेतीमालाचे उत्पादन खर्च, तसेच बाजारभाव, यावर सरकारचा हस्तक्षेप कमी करणे आवश्यक आहे.जर शासनाने शेती विरोधी कायदे जसे की कमाल जमीनधारणा कायदा, जमीन अधिग्रहण कायदा, आणि आवश्यक वस्तू कायदा रद्द केले, तर शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनावर योग्य किंमत मिळू शकेल. व्यापार्यांच्या कृत्रिम भाववाढीला थोपवून शेतकऱ्यांना त्यांचा हक्क मिळेल. त्याचप्रमाणे, शेतकरी आपल्या उत्पादनाला योग्य भाव मिळवण्यासाठी स्वावलंबी होऊ शकेल.अशाप्रकारे, शेतकऱ्यांसाठी वास्तविक आणि परिणामकारक उपाययोजना लागू करण्यासाठी शासनाने कायद्यांचा पुनरावलोकन करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक कायदे रद्द झाल्यास शेतकरी स्वतःच्या हक्कासाठी लढा देऊ शकेल, आणि त्याच्या शेतीमालाला योग्य किंमत मिळवू शकेल.त्यामुळे, २६ जानेवारीला राष्ट्रीय किसान दिवस साजरा करत असताना शेतकऱ्यांना फक्त शुभेच्छा न देता, त्यांना त्यांच्या हक्काचा मुलभूत अधिकार मिळवण्याची गरज आहे.



## करुणा आणि दया ज्याचे हृदयी

# संपत्ती आणि समृद्धी आपोआप त्या घरी–ह.भ.प.बाबा महाराज ढवळे

**सोलापूर । प्रतिनिधी**

दुसऱ्याचे दुःख वाटून घेण्याची भावना निर्माण होणे, अडचणीतल्या माणसाला दया करणे, मदत करणे हा विचार जिथे नांदतो, येथे संपत्ती आपोआप येते, असे विचार ह. भ. प. बाबा महाराज ढवळे हाळगावकर यांनी कीर्तनातून व्यक्त केले.दत्त जयंती निमित्त महेश चिवटे यांच्या हिवरवाडी येथील फार्म हाऊस येथे आयोजित केलेल्या कीर्तन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी बाबा महाराज ढवळे यांनी सांगितले की, दुसऱ्याच्या दुःखाला आणि अडचणीला आनंद म्हणून उपभोगणे ही राक्षस प्रवृत्ती आहे. ज्ञानेश्वर माऊलीने दुसऱ्याला मदत करणे, त्याचे दुःख वाटून घेणे आणि आपल्या मनात प्रत्येकाबद्दल दया व करुणा ठेवा, असे सांगितले आहे.

समाजात सध्या उलटी परिस्थिती आहे आणि ज्ञानेश्वर माऊलीचे विचारच नव्या पिढीला जीवनाचे महत्त्व सांगू शकतात, असेही बाबा महाराज यांनी स्पष्ट केले. शालेय शिक्षणांबरोबर ज्ञानेश्वरीचे वाचन आणि त्याचा अर्थ विद्यार्थ्यांना देणे ही पालकांची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.




या कीर्तन सोहळ्यात ह. भ. प. गुलाब महाराज हाडगळे, ह. भ. प. देविदास गोरे, मृदंग वादक ह. भ. प. प्रवीण वाघ, अजिनाथ पोळ, अण्णा सुपनवर, भाऊसाहेब रोडे, दत्ता कदम, भुजंग वीर, संदीपान काळे, भागवत ढावरे, सर्जेराव वीर, भरत वीर, कांतीलाल वीर, विश्वनाथ शिंदे, अशोक वाघमोडे, बापू लोहार, गोपाळ धोकटे, लक्ष्मण बेरे, उत्तम भोसले, रुपेश राठोड यांनी साथ संगत केली. दत्त मंदिर उत्सव समितीच्या वतीने ह. भ. प. नरसिंह चिवटे यांनी कीर्तन कार्यक्रमापूर्वी प्रवचन केले. कार्यक्रमात विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, सौ. जयश्रीताई घुमरे, पत्रकार अशोक नरसाळे, नासिर कबीर, सिद्धार्थ वाघमारे, सचिन जव्हेरी, विशाल परदेशी, अलीम शेख आणि इतर मान्यवर उपस्थित होते. या कीर्तन सोहळ्याचे संयोजन-नियोजन भोसे गावचे सरपंच आणि माजी मुख्याध्यापक निवृत्ती सुरवसे यांनी केले. ह. भ. प. बाबा महाराज ढवळे यांनी प्रत्येक गावात आठ दिवस श्रीराम कथेचे आयोजन करणे, आणि त्यातून सुसंस्कृत पिढी घडविण्याचे आवाहन केले.

# लोकाभिमुख कामे करुन प्रशासन गतिमान करा–जिल्हाधिकारी गौडा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

गुड गव्हर्नस विक-२०२४ अंतर्गत प्रशासन गाव की और मोहीम दि. १९ ते २४ डिसेंबर २०२४ या कालावधीत राबविण्यात येत आहे. या मोहिमेतंर्गत नागरिकांच्या तक्रारींचे निवारण तसेच शिबिराच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहचून ऑनलाईन सेवा पुरविण्यात येत आहेत. नागरिकांनी शासकिय कार्यालयाकडे केलेल्या तक्रारीचे विहित कालावधीत निवारण करणे. प्रलबिंत तक्रारीचा निपटारा करण्यासोबतच, जिल्ह्यामध्ये लोकाभिमुख कामे करुन प्रशासन गतिमान करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी यावेळी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन सभागृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, सर्व तहसिलदार, विविध विभागाचे विभाग प्रमुख आदी उपस्थित होते.




जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, सर्वसामान्य जनतेची कामे प्राधान्याने निकाली काढावीत. जनतेच्या समस्या व तक्रारी जाणून घ्याव्यात. २१ दिवसाच्या वर प्रलंबित असलेली तक्रारींची यादी करावी. तसेच सदर प्रकरणे प्रलंबित राहता कामा नये याबाबत दक्षता घ्यावी. केंद्र शासनामार्फत सदर सुशासन सप्ताहाचे मॉनिटरींग केल्या जात आहे. त्यामुळे विभागांनी केलेल्या कामाचे रिपोर्टिंग करावे. सर्वसामान्य नागरिकांसाठी आपल्या विभागामार्फत सुशासन संबंधात केलेल्या उत्कृष्ट कामाची, वैशिष्ट्यपूर्ण व नाविन्यपूर्ण उपक्रमाची माहिती व संबंधित फोटो सादर करावेत. निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार म्हणाले, गत चार वर्षापासून गुड गव्हर्नन्स विक साजरा केला जातो. या माध्यमातून जनतेपर्यंत प्रत्यक्ष पोहोचून कॅम्पेन मोडमध्ये सुविधा व सेवा पुरविण्यात येतात. या सप्ताहात (१९ ते २२ डिसेंबरपर्यत) जिल्हा तसेच तालुकास्तरावर विविध विभागाच्या माध्यमातून उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. आरोग्य शिबिरे, शेतकऱ्यांना सातबारा, जन्म/मृत्यु दाखला, विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच इतर महत्वपुर्ण दाखले वितरीत करण्यात आले.

# कुर्डुवाडीत अमित शहा व रामदास आठवले यांच्या विरोधात घोषणाबाजी करून केला संतप्त समाज बांधवांनी निषेध

**सोलापूर । प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल संविधान सभागृहामध्ये देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी अपमानजनक शब्द उच्चारले व सदर गोष्टीचे समर्थन भाजपचे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केल्यामुळे कुर्डुवाडी व करमाळा तालुका वतीने गांधी चौक कुर्डुवाडी येथे निषेध व्यक्त केला.

यावेळी साहेबराव वाघमारे यांनी आपल्या भाषणात अमित शहा यांच्या वागण्यावर टीका केली. त्यांनी म्हटले की, अमित शहा यांच्या उधळलेल्या शब्दांनी त्यांना आत्मगौरवाची गाठ लागली असावी, परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संघ व भाजप सरकारला आंबेडकर नावाचा जप करून जनतेच्या मनाचा आदर जिव्हारी लागला होता. या नेत्यांना हया स्वप्ना पडतात, परंतु हकिकतींना स्वीकारणे गरजेचे आहे. तसेच, त्यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाच्या महत्त्वाचा उल्लेख करत, देशाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाची आणि




बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाची आवश्यकता आहे. हेच खरे सामाजिक न्याय आहे, असे सांगितले. रामदास आठवले यांच्या हालचालींवरही त्यांनी टीका केली. रामदास आठवले दलित मुस्लिम समाज आणि वंचित घटकांबाबत चुकूनही आवाज उठवत नाहीत. परभणी प्रकरणी ते गप्प बसले. अशा नेत्यांना समाजात स्थान देणे हे समाजासाठी धोक्याचे ठरते, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी घोषणाबाजी करत समाज बांधवांनी आपला संताप व्यक्त केला. अमित शहा, रामदास आठवले भडवा हैं, अशा घोषणांनी गांधी चौक दणाणला. कार्यक्रमात युवा भीम सैनिक साहेबराव वाघमारे, युवा नेते प्रदिप (पॅडी) सोनटक्के, तालुक्याचे नेते जीतू (भाऊ) गायकवाड, हांबिरराव गोरे, वसीम मुलाणी, गणेश (दादा) घुगे, एम.डी साबळे, विनोद (एक्का) सोनवणे, अण्णा साळवे, अभिमान गायकवाड, लल्या (भाई) लेंगरे, दयानंद जानराव, अशपाक तवकल, कृष्णा हजारे, सनी खवळे, करण वाघमारे, अमन कांबळे, कन्हैया ओहोळ, विवेक वाघमारे, काशी पांडगळे आणि सह तालुक्यातील समाजबांधव, संविधान प्रेमी, आंबेडकरवादी प्रतिष्ठीत नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाघाच्या हल्ल्यात साठ वर्षीय महिलेचा मृत्यू

**राजुरा । प्रतिनिधी**

राजुरा तालुक्यातील विरूर परिसर वाघांच्या हल्ल्यामुळे हादरला आहे. शेतात काम करणाऱ्या एका वृद्ध महिलेवर वाघाने हल्ला करून ठार केल्याची ही आठवडाभरातील दुसरी घटना आहे. मृत महिलेचे नाव वत्सलाबाई अर्जुन आत्राम असून, ती राजुरा तालुक्यातील कविपेठ येथील रहिवासी होती.

वन विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, आज सोमवारी वत्सलाबाई शेतात काम करण्यासाठी गेल्या होत्या. काही वेळाने त्या शेतातील झोपडीत गेल्या असता, दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक हल्ला चढविला. वाघाने महिलेला फरफटत नेत असताना सहकाऱ्यांनी आरडाओरड करून वाचविण्याचा प्रयत्न केला, परंतु तो प्रयत्न निष्फळ ठरला. काही वेळातच त्या महिलेचा मृत्यू झाला. वाघाच्या हल्ल्याचे सत्र सुरू झाल्याने परिसरातील नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील आठवड्यात विरूर परिसरात एका युवकावर वाघाने हल्ला केला होता, आणि आता शेतात काम करणाऱ्या ६० वर्षीय



महिलेचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड दहशत निर्माण झाली आहे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी मृत महिलेचा मृतदेह ताब्यात घेतला असून पंचनामा करून उत्तरी तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे. वाघाच्या हल्ल्याच्या वारंवार घटना घडत असतानाही वनविभागाने योग्य उपाययोजना केली नाहीत, यामुळे वनविभागा विरोधात प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे.

# जल्हा बँक सक्षमीकरण अभियानास सहकारी संस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुलगाव । प्रतिनिधी**

वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सक्षमीकरण अभियानांतर्गत सहकार विभागाच्या सहकारी संस्था सहाय्यक निबंधक तालुका देवळी कार्यालय यांच्या वतीने दिनांक २२ डिसेंबर २०२४ ला मातृसेवा नागरी सहकारी पतसंस्थेच्या मातृसेवा सभागृहामध्ये सभा पार पडली.

यावेळी बँक सक्षमीकरण सभेच्या अध्यक्षस्थानी डॉ. हेडगेवार अकृषक सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष जयंतराव ओक हे होते. मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाचे मुंबई मंत्रालयाचे सहसचिव संतोष पाटील, प्रमुख अतिथी जिल्हा उपनिबंधक सीमा पांडे, कृषी उत्पन्न बाजार समिती पुलगावचे सभापती मनोज वसु, देवळी तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष अमोल कसनारे, वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कोरडे, देवळी तालुका सहकारी संस्था सहाय्यक निबंधक मनिषा मस्के प्रामुख्याने उपस्थित होते.

दीप प्रज्वलन व भारतमाता पुजनाने कार्यक्रमाची सुरवात झाली. सहकार विभागातील अधिकारी वर्गाने पाहुण्यांचे स्वागत केले. मातृसेवा नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने संस्थापक अविनाश भोपे यांनी अतिथिंचा सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा उपनिबंधक सिमा पांडे यांनी केले.उपस्थित सहकारी संस्थांच्या पदाधिकारी यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या भविष्याबद्दल अपेक्षा व्यक्त करून शंकाचे निरसन करून घेतले.

यानंतर प्रमुख मार्गदर्शक सहकार विभाग मंत्रालय सहसचिव संतोष पाटील यांनी पावर पॉईंट प्रेसेंटेशन च्या माध्यमातून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या स्थापनपासून आजपर्यंत अद्ययावत माहिती, झालेली प्रगती व भविष्याकालीन योजना याची माहिती दिली.उपस्थित सहकारी संस्था प्रतिनिधिना संस्थेच्या व त्यांच्या ठेवी बँकेत ठेऊन बँकेसोबत आर्थिक व्यवहार सुरु करण्याचे आवाहन केले. राज्यातील सहकार विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी



आपल्या ठेवीवर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेवल्या असून शेतकरी व इतर नागरिकांनी बँकेच्या विविध कर्ज योजनेचा लाभ घेऊन बँक सक्षमिकरण अभियानात आपले योगदान देण्याची गरज विशद केली. लवकरच पुलगाव व सिंदी येथील बँकेच्या शाखा सुरू करण्याबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मनोज बसू यांनी रुपये दहा लाख ठेवीचा चेक दिला. तसेच फुलगाव शाखा सुरू करण्याची परवानगी मिळाल्यास तू शाखा नूतनीकरण वरंगरू मोठी करण्यास आर्थिक सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. देवळी तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष अमोल कसनारे यांनी रूपे दहा लाखाची ठेव दिली. मातोश्री महिला नागरी सहकारी पतसंस्था एक लाख, भारतीय महिला ग्रामीण विकास सहकारी पतसंस्था, साई ऍग्रो ट्रेडिंग, वैयक्तिक देवेंद्र हर्षे, श्याम टावरी, निलेश ढोमणे, सुनील बांगरे, अजय बैतुले यांनी प्रत्येकी पन्नास हजार रुपये ठेवी दिल्या तर साहेबराव कुडे अडीच लाख रुपये, सुनिल बेलपांडे पंचेवीस हजार, धनंजय येखंडे पंधरा हजार, या सर्व ठेवी देवळी शाखेचे शाखाधिकारी यांना सुपूर्त करण्यात आल्या. जिल्हा बँक सक्षमीकरण अभियानाच्या यशस्वी करता देवळी तालुका सहकारी संस्था सहाय्यक निबंध मनीषा मस्के यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन गजेंद्र गालपिल्लेवार यांनी केले तर आभार संजय कोरडे यांनी मानले. सभेला पुलगाव देवळी परिसरातील सहकारी संस्थेचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी करिता सहकार विभाग व मातृ शिवा नागरी सहकारी पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.